वर्ष : सतरावे
सप्टेंबर २०२५
अंक : नववा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५२

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

'स्वस्थ' व 'स्वराज्य' या दोन संकल्पनांतून तयार झालीय
'आरोग्य-स्वराज्य' ही नवसंकल्पना!
म्हणजेच आपल्या आरोग्यावर आपली सत्ता.

व्यक्ती, कुटुंब, गाव व देश यांनी
आरोग्य-स्वराज्य या मार्गावर वाटचाल कशी करायची? सांगत आहेत,
सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. अभय बंग......



नवरात्रोत्सवाच्या जोडीला 'राजहंसी' पुस्तक महोत्सव

# इंद्रधनुषी साहित्य योजना

## सप्ततारांकित लेखकांची राजहंसी पुस्तके

## २५% सवलतीत

सप्टेंबर २०२५ महिन्यातील सप्ततारांकित लेखक



वीणा गवाणकर



विनया खडपेकर



मंगला आठलेकर



सोनाली कुलकर्णी



विशाखा पाटील



माधुरी शानभाग



मेघना पेठे

**योजनेचा कालावधी १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५.**

ऑक्टोबर महिन्याच्या सप्ततारांकित लेखकांची घोषणा सप्टेंबरअखेर.

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक नववा
१५ सप्टेंबर २०२५

मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *आबली* - वैशाली जोशी / ९
  *अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान*
  - किरण डोंगरदिवे / १२
- वसा अक्षर चळवळीचा
  *रसिक वाचक, ठाणे - भूषण मुळ्ये*
  *- शब्दांकन : मनीषा चव्हाण* / १९
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / २३
- असे जन्मले पुस्तक!
  *गोष्ट रिझर्व्ह बँकेची* - विद्याधर अनास्कर / २७
- आठवणींचा पारिजात
  *श्री. ज. जोशींची भेट* - श्रीराम रानडे / ३१
- क... कवितेचा - अद्वैता उमराणीकर / ३५
- उद्‌गार -
  *अजान आणि चालिसा* - साबीर सोलापुरी / ३७
- राजहंसी पार / ४१
- वाचकांच्या मनातलं... / ४५


---

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके




मरहूम उस्ताद अल्लादिया खांसाहेब म्हणजे जणू ‘गायनाचे गौरीशंकर’!
त्यांच्या गायकीच्या आजच्या घडीला कार्यरत वारसदारांपैकी डॉ. अश्विनी भिडे देशपांडे सांगत आहेत त्यांची चरितकहाणी.
या जीवनकथेतून खांसाहेबांचे व्यक्तिमत्त्व कधी सौंदर्यपूर्ण, प्रमाणबद्ध स्थापत्यासारखं उभं राहतं, तर कधी त्यांच्या पारिवारिक आणि गुरुशिष्य नातेसंबंधांचं नाजूक, जरतारी विणकाम उलगडतं.
त्यांच्या व्यक्तित्वाच्या या मनोहारी रंगच्छटा म्हणजे रसिक वाचकांना तसेच अभिजात संगीताच्या साधकांना लाभलेली शब्दमैफिलीची पर्वणीच!

### मी... अल्लादियाखां

अश्विनी भिडे देशपांडे

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)




युद्धाला द्यायला हवा ठाम नकार... या पुस्तकात आहे - युद्धांमागील राजकारण, प्राणघातक शस्त्रास्त्रांच्या शर्यती, अतिरेकी राष्ट्रवादाचे दुष्परिणाम यांसह युद्ध आणि शांतता यांचा सम्यक विचार. त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय मुत्सद्दीगिरी, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान आणि इतिहास यांचा युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने घेतलेला परामर्श...

### युद्ध नाकारणारे जग

संदीप वासलेकर
अनुवाद : डॉ. परिमल माया सुधाकर

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

## भाषासंगमाकडून संस्कृतिसंगमाकडे...

*भाषा ही केवळ संवादाचे साधन नाही तर ती समाजाच्या विचारसरणीची, जीवनपद्धतीची आणि सांस्कृतिक ओळखीची प्रमुख दुवा आहे. त्यामुळे भाषांचा संगम झाला की संस्कृतींचाही संगम आपोआप घडेल. 'भाषासंगम' या संकल्पनेत विविध भाषांचे आदानप्रदान आणि सहजीवन सामावलेले आहे, हे आजच्या भाषिक हेवेदावे होत असल्याच्या काळात आपण समजून घ्यायला हवे.*

वाचकहो नमस्कार.

'भाषासंगमातून माणूसपणाचं होणारं उज्जीवन' या संदर्भानं काहीएक विचार मांडावेत असं मनात आहे. नारळी पौर्णिमेला 'संस्कृत दिन' साजरा झाला. १४ सप्टेंबरला देशभर 'हिंदी दिन' साजरा होत असतो. अन्य भाषाभगिनींचेही असे दिनविशेष आहेत. जनमानसात भाषेचं महत्त्व रुजवणं आणि भाषाभगिनींमधील सौहार्द वाढवणं हा यामागील एक हेतू आहे. प्रत्यक्षात मात्र आज काय चित्र दिसतंय? भाषादिन साजरे होतात; पण भाषेच्या वहनातून व्यक्तीचा वैश्विकतेपर्यंतचा जो प्रवास घडणं अपेक्षित आहे, तो घडतो आहे काय? माणूसपण तळातून कसं एक आहे हे भाषेतून पोहोचणं आवश्यक आहे, ते आज घडतं आहे काय? सहिष्णुपणातून आपण भाषिक व्यवहाराकडे पाहतो आहोत काय? हे विचारमंथन आवश्यक आहे.

'एक भारत - श्रेष्ठ भारत' या देशव्यापी अभियानांतर्गत 'भाषासंगम' कार्यक्रमही हल्ली राबवला जातोय. आपली संस्कृती ही केवळ सण-उत्सवांपुरती मर्यादित नाही; तर ती जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात व्यक्त होत असते. विविध कला, आहारसंस्कृती, लोककथा, लोकपरंपरा या सर्वांवर भाषेचा खोलवर प्रभाव आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषासंगमाला आणखी व्यापक परिमाण लाभलं आहे; मात्र त्याचबरोबर भाषिक वाद आणि त्यातून सांस्कृतिक संघर्षही होताना दिसतोय. या पार्श्वभूमीवर भाषेचं प्रयोजन व तिचं मोल आपण उमजून घेऊ या.

भाषा ही अर्थपूर्ण शब्दांचा सुसंगत मेळ आहे. कबीर म्हणतात,

*'सब्द बराबर धन नहीं जो कोइ जानै बोल,*
*हीरा तो दामौ मिलै सब्दहिं मोल न तोल.'*

हाच भाव कविवर्य मंगेश पाडगावकर व्यक्त करताना म्हणतात,

*'शब्दा ऐसें धन नसे, ज्ञानाचे जर बोल,*
*बाजारात हिरा मिळे, शब्दा मोल न तोल.'*

दोन वेगळ्या कालखंडांतील कवींमधला हा बंध सांधला गेलाय तो भाषा-संगमामुळेच. अशी अनेकच उदाहरणं आहेत. आपल्या साध्या-सामान्य व्यवहारातील हेतुसिद्धीपासून ते परतत्त्व-स्पर्शापर्यंतचा प्रवास घडवण्याची ताकद भाषेमध्ये आहे. तीच भाषेची शक्ती आहे. आपल्या मातृभाषेसोबतच इतरही भाषांमधील ज्ञान आपण हळूहळू आत्मसात करून घेतलं तर आपलं जगणं किती सुंदर होईल! पण अनेक जण मातृभाषेच्या अतिरेकी अट्टाहासापायी अन्य भाषांच्या सौंदर्याला मुकतात. अशा व्यक्तींनी हे समजून घ्यायला हवं की, मातृभाषा तिच्या ठायी महत्त्वाची आहेच; पण जर आपल्याला व्यापक व्हायचं असेल, विश्वाशी संवाद साधायचा असेल तर अन्य भाषांप्रतिही आपला भाव अगत्यशील असायला हवाय. आत्मसात केलेल्या अन्य भाषा आपण आवश्यक तेथेच संवादात, अभिव्यक्तीत उपयोगात आणल्या तर आज भाषेमुळे जे प्रश्न निर्माण झाले आहेत ते मिटतील.

आपली व्यक्त होण्याची भाषा आणि आकलनाची भाषा वेगळी असू शकते. आकलनाची भाषा हीच प्रधान, नित्य व्यवहाराची भाषा व्हावी हा दुराग्रह ना मातृभाषेच्या हिताचा आहे, ना एकूण समाजजीवनाच्या हिताचा आहे. समाज एकसंध राहावा यासाठी भाषेचं प्रयोजन आहे. संतमहात्म्यांनी आपल्या वाङ्मयातून तेच कार्य अखंडपणे केलं. थोर तत्त्वज्ञांनी, विचारवंतांनी तो प्रवाह पुढे चालू ठेवला. आपल्या मातृभाषेचा आदर राखत, तिला प्रत्यक्ष जगण्यातून व संवादातून जिवंत ठेवत त्यांनी अन्य भाषाभगिनींनाही आत्मसात केलं. तुकोबांच्या अभंगात कबीरांचा विचार म्हणूनच तर आलाय. उपनिषदांमधील शिकवण, तत्त्वज्ञान या गोष्टी जगभर जगण्याचा विषय झाल्यात. संत कबीर, संत ज्ञानेश्वर आज ऑक्सफर्ड विद्यापीठात शिकवले जातात. विनोबा अनेक भाषांमध्ये पारंगत होते हे तर सर्वश्रुत आहे. मुन्शी प्रेमचंदजी, रवींद्रनाथ सर्व भारतीय व पाश्चात्य भाषिकांत परिचित आहेत. लो. टिळक, गो. ग. आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, स्वा. सावरकर... आदींपासून ते केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, वि. स. खांडेकर, माधव जूलियन, पु. शि. रेगे... आदींनी अन्य भारतीय भाषा, परकीय भाषा आत्मसात केल्या, पण आपलं मराठीपण शाबूत ठेवूनच. व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातील भाषेचं हे अभिसरण त्या त्या संस्कृतींचं वहन आहे, मूल्यांची रुजवण आहे हे आपण विसरता कामा नये. आपल्या पूर्वसुरींकडून आपण हे शिकायला हवं.

आपल्या विचार-भावनांना व्यक्त करणं हे भाषेचं मूळ प्रयोजन आहे. सामान्य माणूस आपल्या सामान्य गरजांसाठी व्यक्त होतो. कलावंत मंडळी याही पुढे

जाऊन आत्माविष्कारासाठी, तसेच आपल्यातील विकार, विचारांची संगती-विसंगती शोधण्यासाठीही व्यक्त होत असतात. संतमहात्मे, तत्त्वज्ञ या सर्वांच्या पलीकडे जाऊन लोकजीवनाच्या एकसंधतेसाठी, व्यक्तिमनांच्या एकात्मभावासाठी व्यक्त होत असतात. समाजातील या प्रमुख तीन स्तरांतील घटकांचं व्यक्त होण्याचं प्रधान माध्यम 'भाषा' हेच आहे. आपल्या मातृभाषेसोबतच अन्य भाषांमधूनही आपण तेव्हाच उत्तम रितीनं व्यक्त होऊ शकतो जेव्हा अन्य भाषा आपण समग्रतेनं आत्मसात केलेल्या असतात आणि विचारांचं, भावनांचं मूळ स्वरूप आपल्याला उलगडलेलं असतं. हा प्रवास ही एक साधना आहे. बहुभाषिकता आपल्याला व्यापकतेचा अवकाश देते. एक प्रातिनिधिक उदाहरण येथे नोंदवता येईल.

'मॅक्झिम गॉर्की' हा रशियन साहित्यिक, विचारवंत होता. त्याची 'The Mother' ही जगप्रसिद्ध कादंबरी आहे, जी त्याने आपल्या आईलाच अर्पण केली आहे. ही कादंबरी अनेक भाषांत भाषांतरित झाली आहे. मराठीतही या कादंबरीचं भाषांतर झालं आहे. मॅक्झिम गॉर्कीनं आपल्या अभिव्यक्तीसंदर्भात सांगितलेली एक सुंदर आठवण आहे. ती अशी : एकदा आपलं लेखन त्यानं आईला दाखवलं व 'तुला काय वाटतंय' हे विचारलं. त्यावर ती माउली म्हणाली, 'तू जेव्हा लहान होतास तेव्हा तुझी भाषा मला समजायची. तेव्हा तू न बोलताही तुझं म्हणणं मला समजायचं. पण आता तू जे काही बोलतो आहेस, लिहितो आहेस ते मला समजत नाही.' याचा मथितार्थ एवढाच आहे की,

'प्रत्ययकारिता' हा भाषेचा प्रधान गुण आहे. आपल्याला जे म्हणायचं आहे ते समोरच्याला नेमकेपणानं समजण्याइतपत आपली संवादाची भाषा प्रगल्भ असायला हवी. देशोदेशीच्या साहित्यवाचनातून ही प्रगल्भता येत जाते आणि आपली अभिव्यक्ती 'प्रत्ययकारी' होते. त्यासाठी तरी आपण अन्य भाषा अवगत करायला हव्यात. आपल्याला एकदा हे सारं उमजलं तर भाषासंगमाच्या संदर्भानं आपल्याला मातृभाषेच्या अस्तित्वाबाबत भयभीत होण्याचं कारण तरी काय? 'अमृतातेही पैजा जिंके' असं ज्ञानेश्वरांनी प्रतिज्ञेवर सांगितलंय. महत्त्वाचं म्हणजे मातृभाषा आपल्यात आत्मविश्वास निर्माण करत असते. मातृभाषा आणि आपण एकमेकांचं भरण-पोषण करत असतो. शब्दनिर्मिती अखंड होत राहणं ही भाषेची वृद्धी आणि समृद्धी आहे. अन्य भाषांसोबतच्या सहजीवनातूनच ही प्रक्रिया सुलभ आणि सहजतेनं घडत आली आहे आणि पुढेही घडत राहणं आवश्यक आहे. त्यासाठी अन्य भाषांविषयी आपल्या मनात आकसभाव असता कामा नये. भाषांचं विकसन हे शतकानुशतकांच्या परस्परसंवादातूनच, देवघेवीतूनच झालं आहे. मातृभाषेसोबतच अन्य भाषाभगिनींसोबतचा आपला स्नेह दृढ करत 'अधिक देखणें, तरी निरंजन पाहणें' हा ज्ञानेश्वरांचा भाव प्रत्यक्ष जगू या.

**डॉ. प्रिया निघोजकर,** कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




भारतीय रंगमंचावरील कर्तबगार रंगकर्मी, दिग्दर्शिका, अभिनेत्री, लेखिका या विविधांगी भूमिकेतील स्त्री-कलावंतांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध... वीस दिशादर्शक प्रश्नांच्या अनुषंगाने सर्जनशील रंगकर्मींचे हे विचार म्हणजे वाचकांसाठीचा समृद्ध ठेवा...

### वीस प्रश्न

संकल्पना आणि संकलन : महेश एलकुंचवार

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

फादर दिब्रिटो - ख्रिश्चन साधना-धर्मनिष्ठेने अनुसरलेले आणि महाराष्ट्रधर्म जिवापाड जपलेले विश्वाचे नागरिक. त्यांनी धर्माची डोळस चिकित्सा केली, भक्तीला सामाजिक कार्याची जोड दिली. गगनाचा रहिवासी असलेल्या या साहित्यिकाच्या प्रथम स्मृतिदिनी सादर होत आहे -

### सर्वोत्तम व समकालीन
### फादर दिब्रिटो

संकलन व संपादन : करुणा गोखले

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)






औद्योगिक क्षेत्रातील व्यापक अनुभव व प्रदीर्घ अभ्यास, उद्योजकांसोबतच्या उत्तम स्नेहबंधांतून डॉ. अनंत सरदेशमुख यांनी मांडलेले व्यावसायिक यशाचे मर्म, त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील आठ प्रेरक यशोगाथा म्हणजे उद्योजकतेची आकांक्षा बाळगणाऱ्यांसाठी दीपस्तंभच!

### उद्योग यशोगाथा

डॉ. अनंत सरदेशमुख

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## राजहंसी ग्रंथसृष्टी

आबली

*आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात कितीतरी प्रसंग येत असतात.*
*ते नेमक्या शब्दांत, प्रत्ययकारी रीतीनं व्यक्त होणं महत्त्वाचं असतं.*
*आबलीतील प्रत्येक कथा वाचकाच्या हृदयाला भिडते आणि*
*या प्रत्ययकारितेचा अनुभव देते.*

'मुलांचं भावविश्व' - जगाच्या पाठीवर कुठेही जा... त्या वयोगटाप्रमाणे सारखेच असते. फरक असतो तो तिथल्या परिसराचा, वातावरणाचा आणि त्यांना मिळणाऱ्या अनुभवांचा! आणि तेच 'भावविश्व' लक्षात घेऊन आपण ज्या या कथा लिहिल्या आहेत, त्या एका 'संवेदनशील मनाचं' प्रतिनिधित्व करतायेत! खूप खूप छान! (हा शब्द आपल्यातील बालमनासाठी!)

'आबलीच्या चेहऱ्यावर असंख्य फुलं फुलली...' मेंढरं आणि कोकरं एवढंच भावविश्व असणाऱ्या आबलीला नव्या विश्वाची ओळख झाल्याबरोबर तिच्या मनातली भावना या वरच्या वाक्यातून आपण सुंदर मांडली आहे. 'आये, या चित्रात बग...' हे वाक्य तर अचानक आपल्याला नवीन काहीतरी अप्रूप पाहिल्यावर जे वाटतं, ते दाखवून देतात. शाळा, शिक्षण... या प्रवासाची सुरुवात नावीन्यपूर्ण अशा गोष्टींनी व्हायला हवी, हे महत्त्वाचं!

'भटक्यांच्या कळपात पहिल्यांदाच...' हे सारं अशक्य असं काही घडू शकतं? यावर विश्वास न बसणारी गोष्ट आबलीच्या जीवनात घडविणारे नागेश म्हात्रे गुरुजी - असे शहरातही निर्माण व्हायला हवेत. नाही का!

'पाठीवर बिऱ्हाड लागलेल्या...' इथे मात्र डोळे ओले होणं, भरून येणं घडतंच. आबलीची शाळेकडची सुंदर वाटचाल, तिचं त्यात रमणं... हे सारं वाचताना 'चला, एक छान काम झालं' असा विचार येतो. इतक्यात कथेचा शेवट... नव्हे वास्तवात असं घडतंच... ही गोष्ट मनाला रुखरुख लावते आहे...!

*सुट्टी* - 'सुट्टीला मुंबई सोडून गावाकडे जायचं...'पासून 'सारी सुट्टी काळजात साठवून... धीरज मुंबईकडे निघाला...'पर्यंतचा प्रवास एका भावविश्वाला दुसऱ्या भावविश्वात आश्वासकरीत्या नेणारा प्रवास खूप सुंदर रेखाटला आहे आपण! त्याची सुरुवात 'बैलांच्या हंबरण्याचे वेगवेगळे अर्थ तो रोज शोधू लागला.' या वाक्यानं करून

तो हळूहळू त्या दुसऱ्या भावविश्वात शिरल्याचं जाणवून दिलं आहे. गावाकडील माणसांबरोबरच तिकडचे मुके प्राणी, झाडं, माती सारंच अनोखं असतं हेच खरं!

*आकाशकंदील* - या कथेविषयी तर आपलं बोलणं झालं होतंच... त्यातलं आवडलेलं - 'मावळतीचा सूर्य खंडोबाच्या डोंगराला... उजाडूच नये असंही त्याला वाटायचं.' मला वाटतं हे तर बालमन आहे, पण आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असे कितीतरी प्रसंग येत असतात, की ज्या वेळी आपली अशी भावना असते... त्या वेळी ती वेळ तशीच थांबावी असं आपल्याला वाटतं. नेमक्या छान शब्दांत हे मांडलं आहे आपण! 'भिवा, ते महाग असतं... करायचंय ते स्वांग!' परिस्थितीनं हतबल असलेल्या प्रत्येक बापाचं हे वाक्य असतं... मग तो भिवाचा गावाकडचा आप्पा असो वा शहरातला एखादा बाप! खरंच, पैशाचं सोंग नाही आणता येत. आपल्या पालावर आकाशकंदील लावण्याची कल्पना आणि भिवाची त्यासाठीची तयारी... शहरात किंवा सधन कुटुंबात काय हो? - बाजारात जायचं, महागातला महाग आकाशकंदील खरेदी करायचा आणि दिवाळी संपली की टाकून द्यायचा... पुढच्या वर्षी नवीन! अशी भावना असणाऱ्यांना 'आकाशकंदील' कथा वाचायला द्यायलाच हवी!

'चुलीचा जाळ सोडला तर या उघड्या... पणतीसुद्धा लावता येत नाही.' हे वाक्य तर त्या मेंढपाळांच्या जीवनातील प्रत्येक गोष्टीत येणारा संघर्ष दाखवते आणि मनाला चुटपुट लावते.

'माझ्या बिऱ्हाडावरपण दिवाळी आलीय.' हे सकारात्मक वाक्य पूर्ण संघर्ष करणाऱ्या अशा लोकांचं प्रतिनिधित्व करतं, जे संघर्षमय (अगदी जीवनातल्या छोट्या-छोट्या गोष्टींसाठी) जीवन जगतानाही छोट्या-छोट्या गोष्टींच्या परिपूर्णतेचा आनंद घेत राहतात! खूप छान!

*झिंगऱ्या* - 'आज सापडणारी आमली... तर होती एका सुंदर स्वप्नांची सुवासिक दुनिया! पोटाची खळगी भरण्याची ज्याची मारामार होते... अशांनी स्वप्ने ती काय पहावी?'... असाच नूर काहीसा या कथेतून आपण उत्तमरीत्या मांडला आहे. पण साधं शर्ट घेण्याचंच स्वप्न पाहणाऱ्या आणि ते पूर्ण व्हायच्या आतच विरून जाणं हे तर नेहमीच ज्यांच्या जीवनात घडत असतं, ती सारी प्रतिकूल परिस्थितीला सकारात्मकरीत्या कशी सामोरी जातात हे 'झिंगऱ्या' दाखवून देतो. आपल्या कथेच्या शेवटच्या वाक्यातून जन्म-मृत्यू हेसुद्धा अगदी किड्यामुंग्यांसारखे होत राहतात त्या झिंगऱ्या आणि त्याच्याचसारख्या इतरांना सहीसलामत राहणंच किती सकारात्मक बनवतं! (आम्ही आपले दर सहा महिन्यांनी हजारो रुपये खर्च करून मेडिकल चेकअप करत राहतो.)

'बापरे!' 'आजूबाजूला आवाज करणाऱ्या अनेक फटाक्यांत एक फटाका माझा

पण असेल!' किती आत्मविश्वासपूर्ण वाक्य आहे! अशा वेळी एका लेखकाचं एक वाक्य आठवतं - 'वेदना ही मला मिळालेली दैवी देणगी आहे!' झिंगऱ्याची कथा युवक पिढीला वाचायला द्यायलाच हवी.

*पाटी* - 'शिक्षण सर्वांसाठी' ही गरज कोणाची पूर्ण होते? 'जिथे दोन वेळचं खाणं मुश्कील... याची जाणीव संपाला होती.' या वाक्यातून तर हेच निश्चित होतं की शिक्षण घेणं हे 'त्या' लोकांसाठी चैनीची गोष्ट ठरते.' बबईचं 'पाटी' वेड आपल्याला एका वेगळ्या जगात नेऊन सोडतं. तिची 'पाटी' फुटणं आणि तिला ती घेऊन देता येणार नाही यासाठीचा माईचा त्रागा आणि तिची समजूत घालण्यासाठी आणि तिला 'पाटी' घेऊन देण्यासाठीची संपाची धडपड... खरंच, सर, मनाला खोलवर विचार करायला लावते.

'पिकून रसभरित झालेल्या... पाटीवरची पेन्सिल!' हा भाग तर पोट भरण्यासाठी अपार कष्ट करणाऱ्यांचं 'शिक्षणा'चं स्वप्न त्यांच्या कष्टातही ते कसं शोधतात हे दाखवून देतो. खूप छान! शेवट... मनाला रुखरुख लावणारा!

*डूल* - या कथेविषयी तर इतकंच सांगेन, की माझ्यासारख्या संवेदनशील शिक्षिकेनं लक्षात ठेवायचं आहे की, 'आपल्यासमोर 'भारती'सारखे अनेक जीव येत राहतात... त्यांना जर आपण उत्तमातलं उत्तम दिलं, तर आपल्यालाही त्याचा परतावा खूप सुंदर असा मिळतोच!' 'रचनाबाईंच्या प्रतीकात्मक भावनेला सलाम!'

*बैजी* - अशा 'बैजी' तर मी खूप पाहते इथे शहराकडे, पण त्यांच्यासाठी काही


मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढावी, म्हणून
जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनेक अभिनव उपक्रम
राबविणाऱ्या एका शिक्षकाने लिहिलेल्या या कथा!
स्थानिक बोली अन् ग्रामीण मातीचा गंध असलेल्या,
ग्रामीण आयुष्याचे अनेक पदर
वाचकांसमोर आणणाऱ्या...

आबली

प्रमोद प्रकाश धायगुडे

किंमत : ₹ १००/- । (ट.ख. ₹ ५०)



करणं... हे होणं नाही. त्यासाठी खूप तयारी असावी लागते... बिराजदारसरांसारखी शोधक वृत्ती आणि प्रयत्नांची कास असायला हवी...

बैजीचं भावविश्व आणि नंतर तिला मिळालेलं नावीन्यपूर्ण असं शाळेचं वातावरण तिच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरणार होतं खरं... पण शेवटी पुन्हा एकदा पोटासाठी झगडणं, संघर्ष करणं आड आलंच!... पण त्यातूनही बिराजदारसरांनी तिच्यावर घेतलेली मेहनत आणि तिच्या भावविश्वात निर्माण झालेला देशाविषयीचा विश्वास तिला पुढे सकारात्मक जीवन जगण्यासाठी प्रेरणादायी ठरणार होता हे नक्की!... खूप छान!

अजून कथा यायला हव्या होत्या. म्हणजे तुम्ही लिहायचं, आम्ही वाचायचं आणि विचार करायचा... आणि खरं सांगू, ‘मनात विचार आला की कृती घडत जाते...’ अशाच कथा आपण लिहा!

आता एकूण पुस्तकातील मांडणीसंदर्भात सांगेन. माझे आवडते लेखक व्यंकटेश माडगूळकरांची ‘माणदेशी माणसे’, ‘बनगरवाडी’ कायम मनात घर करून राहिली आहेत आणि त्याच धर्तीवर म्हणायचं झालं, तर तुमच्या कथेतील गाव, परिसर, व्यक्तिचित्र, राहणीमान... या अनुषंगानं वर्णन इतकं सविस्तर, बारीकसारीक गोष्टी, भावना - इतक्या छान टिपल्या आहेत आपण - की त्यामुळे कथा वाचताना तो परिसर, ती व्यक्ती डोळ्यांसमोर अगदी हुबेहूब उभी राहते! हे तुमच्या लेखनाचं खरं कौतुक आहे.

***वैशाली महेश जोशी***
९८३३५६१४२१

---

## अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान : साहित्य आणि व्यक्तिमत्त्व

अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यसृष्टीला पडलेले भरजरी स्वप्न होते. बहिणाबाई चौधरी यांच्याप्रमाणे शाळेचे तोंड न पाहणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांचा ‘साहित्यसम्राट’ म्हणून होणारा गौरव ही त्यांची साहित्यावरची निष्ठा आणि साहित्यातील जीवन संदर्भाच्या लिखाणाबाबत केलेल्या कष्टाचे फळ आहे असे मला वाटते. वगनाट्य, पोवाडा, कथा, प्रवासवर्णन आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे कादंबरीलेखन असा प्रचंड व्यासंग असलेला हा साहित्यिक महाराष्ट्राच्या भूमीवर जनसामान्याचे जीवन जगला आणि लिखाणातून सातत्याने क्रांतीची बीजे पेरत गेला.

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वाचताना जी उभारी आणि प्रेरणा मिळते तेवढीच

ताकदीची उभारी आणि प्रेरणा अण्णा भाऊ साठे यांच्याच परिसरात जन्मलेल्या पानिपतकार विश्वास पाटील यांच्या लेखनातूनही मिळत असते. 'पानिपत', 'झाडाझडती', 'पांगिरा', 'संभाजी' हे त्यांनी केलेले लेखन वाचतच महाराष्ट्रातील अनेक साहित्यिक घडले असे मला वाटते. विश्वास पाटील यांनी नुकतीच एक दास्तान लिहिली आहे ती आपण वाचलीच पाहिजे या जाणिवेतून 'अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान' हा ग्रंथ मी वाचायला घेतला. शीर्षकावरून अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर लेखकाने प्रकाश टाकला असेल असा सरळ विचार करून ही दास्तान वाचायला घेतली तर आपली गफलत होऊ शकते, कारण विश्वास पाटील यांनी या ग्रंथात अण्णा भाऊ साठे यांची साहित्यनिर्मिती आणि त्यांचे जीवनचरित्र यांचा अतिशय संशोधनात्मक रीतीने अभ्यास करून परस्परांचा समन्वय साधत आजपर्यंतच्या कोणत्याही चरित्रात्मक लिखाणाचा पायंडा मोडीत काढत एक विलक्षण असे साहित्य समीक्षण आणि व्यक्तिमत्त्व उभारणी या तत्त्वावर हा ग्रंथ आपल्यासमोर ठेवला आहे. 'अण्णा भाऊंचे गाव माझ्या जन्मगावापासून ३० किमी अंतरावर असून वारणा नदीच्या पाण्यावरच आम्हा दोघांचा पिंड पोसला' या मनोगतातील वाक्यातून विश्वास पाटील यांनी अण्णा भाऊंसोबतचा आपला ॠणानुबंध काय आहे? तेच जणू जाहीर केल्याचे दिसून येते.

अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनातील अनेक दुर्लक्षित आणि अस्पर्शित घटना आणि बाबी यांचा उलगडा विश्वास पाटील यांनी दास्तानमध्ये केला आहे. अण्णा भाऊ साठे आणि विश्वास पाटील या दोघांचा भोवताल समान असल्यामुळे त्या परिसरातील वर्णनाचा अभ्यास करताना त्या भागातील लोकांचा, निसर्गाचा, संस्कृतीचा योग्य संदर्भासह अन्वय लावून मांडणी करणे हा महत्त्वाचा भाग विश्वास पाटील यांना लीलया साधला आहे.

विश्वास पाटील म्हणतात, 'अण्णा भाऊ साठे यांनी मराठी भाषा एकलव्यासारखी आत्मसात केली.' हे वाक्य मला खूप आवडले कारण फक्त दीड दिवसाची शाळा शिकलेले अण्णा भाऊ साठे स्वत:च्या अनुभवविश्वातून भाषा शिकत गेले आणि शिकता शिकता त्या भाषेला समृद्ध करत गेले हे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील साहित्यिक ज्या काळात फुले, कळ्या, गवत आणि पाकोळ्या मोजत बसले होते त्या काळात अण्णा भाऊंची लेखणी महानगरातील पगडीचे प्रश्न, लयास जाणाऱ्या चाळी, सिमेंट काँक्रीटची उभी राहणारी जंगले, महानगरातील गुंडगिरी, देशातील भांडवलशाही, झोपडपट्ट्यांचे प्रश्न, मातंग समाजाच्या लढवय्या स्वभावाचे वर्णन, महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचा आढावा घेणाऱ्या कादंबऱ्या असे जीवन संदर्भाच्या संबंधित लेखन करत होते. हे विश्वास पाटील यांनी हे ठासून सांगितलेले दिसून येते. अण्णा भाऊंचे जीवन आणि साहित्याचे अनेक पैलू दास्तानच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेच्या समोर आले आहेत. अण्णा भाऊ साठे हे विख्यात शास्त्रज्ञ

डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्यासोबत 'इप्टा' या सांस्कृतिक संस्थेचे संस्थापक सदस्य होते, ही बाब विश्वास पाटलांनी महाराष्ट्राला पहिल्यांदा सांगितली असे मला वाटते. इप्टाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व, होमी जहांगीर भाभा, के. ए. अब्बास यांच्यासोबत संस्थापक सदस्य असणे ही अण्णा भाऊंच्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वाची फार मोठी पावती आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे अण्णा भाऊ साठे, शरदचंद्र चटोपाध्याय आणि मुन्शी प्रेमचंद यांच्याप्रमाणे स्त्रियांच्या व्यथा आणि कथा मांडणारे महत्त्वाचे लेखक होते असे विश्वास पाटलांचे अधोरेखन हीसुद्धा या ग्रंथाची महत्त्वाची उपलब्धी आहे असे मला वाटते.

अण्णा भाऊंची सर्वांत गाजलेली कादंबरी म्हणजे 'फकिरा' ही होय असे मला वाटते. अण्णा भाऊंच्या जन्माच्या अगोदर दोन दिवसांपूर्वी नात्याने मामा असलेला फकिरा आपल्या बहिणीच्या म्हणजे जनाबाईच्या झोपडीसमोर इंग्रजी सैन्य मागे लागलेले असताना येतो आणि इंग्रजांच्या खजिन्याच्या लुटीतील दोन ओंजळी सोन्याचे सुरती रुपये बहिणीच्या ओटीत टाकतो आणि 'बाळ बाळंतिणीची काळजी घ्या रे बाबांनो' असे सांगून निघून जातो या ऋणाची परतफेड म्हणून फकिराच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहासांना भाऊंनी लिहिला आहे. फकिराबद्दल लिहीत असताना सन १९१८मध्ये पडलेला दुष्काळ, व रोमन साम्राज्याचे वैभव असे विषय घेऊन अमेरिकन लेखक हॉवर्ड फास्ट यांची 'स्पार्टाकस' नावाची कादंबरी १९५१मध्ये आली होती तसेच 'फकिरा'च्या आधी १८५७च्या उठावादरम्यान 'नील दर्पण' नावाच्या नाटकाने इतिहास घडवला होता. असे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे दाखले देऊन महाराष्ट्रात जनसामान्याच्या उद्रेकाची झालेली नोंद म्हणजे 'फकिरा' अशी महत्त्वाची भूमिका विश्वास पाटील यांनी घेतल्याचे दिसून येते. ही कादंबरी घडण्याच्या जवळपास दोन दशके अगोदर अण्णा भाऊ कम्युनिस्टांच्या पथकामधून वावरत होते, लेनिन आणि साम्यवादाचा पुरस्कार करत होते. मात्र असे असतानासुद्धा त्यांनी 'फकिरा' लिहिताना त्यात कुठेही प्रचारकी थाटाची ती होऊ दिली नाही. त्यांनी माणसांची आणि त्याच्या त्यागाची विरोधात कहाणी सांगितली मात्र प्रचारकी तडजोड केली नाही. 'फकिरा'मधील महत्त्वाचे पात्र विष्णुपंत कुलकर्णी यांचे १९३२ सालचे दुर्मीळ असे छायाचित्रसुद्धा लेखकाने उपलब्ध करून दिले आहे. वाटेगाव येथे असलेली फकिराची समाधी, कासेगावातली इंग्रजांची छावणी इत्यादीचे छायाचित्रसुद्धा लेखकाने उपलब्ध करून दिले आहे. 'वैजयंता', 'वारणेचा वाघ', 'अलगुज' अशा चित्रपटांच्या निर्मितीच्या बाबतही काही बाबींचा उलगडा या ग्रंथात होतो. 'फकिरा' ही कादंबरी महाश्वेता देवी यांच्या २१ वर्षं आधी अण्णा भाऊंनी लिहिली. त्यामुळे महाश्वेता देवीच्या 'चोटी मुंडा'च्या कितीतरी पुढे 'फकिरा' आहे असे लेखक सुचवतात.

मुंबई शहरात राहताना अण्णा भाऊंच्या परिवाराचे झालेले हाल आणि मुंबईमध्ये

कामगाराचे जीवन जगताना आलेले वेगवेगळे अनुभव अण्णा भाऊंच्या लिखाणाचे विषय झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार चळवळीतले ‘जनता’ या वर्तमानपत्रात येणारे विचार अण्णा भाऊ साठे वाचत होते असे सांगून विश्वास पाटील यांनी बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णा भाऊ साठे यांच्या वैचारिक ऋणानुबंधाचा एक धागा कसा जुळला होता ते सूचित केले आहे. त्याचप्रमाणे १९३४मध्ये रशियन क्रांतीचा इतिहास, लेनिनचे चरित्र, मॅक्झिम गॉर्की यांची मदर यांसह ज्ञानेश्वरीपासून अनेक ग्रंथांचे वाचन त्यांनी केल्याचेसुद्धा आपल्या निदर्शनास आणून दिले आहे. वाटेगावमध्ये परत आल्यावर जातीय व्यवस्थेचे आणि तुच्छतेचे चटके त्यांच्या वाट्याला आले. त्यात सोबत चोर म्हणून समाजावर लागलेला कलंक त्यांना अस्वस्थ करत होता. या सर्व बाबी अण्णा भाऊंच्या लेखणीतून आकार घेऊ लागल्या. वाटेगावच्या जवळ असलेला माकडीचा माळ, किंवा अण्णा भाऊ यांनी आपल्या पहिला कथासंग्रहाला दिलेले ‘खुळंवाडी’ हे नाव म्हणजे ‘खुळंवाडी’ नावाची वस्ती असलेले गाव आहे, अशा अनेक महत्त्वाच्या बाबी दास्तानमध्ये सापडतात.

अण्णा भाऊंच्या कथा आणि कादंबऱ्यांमध्ये जे प्रसंग आणि घटना येतात त्यांच्या निर्मितीची बीजे अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनात कुठे आणि कशी पेरली गेली असावीत याबाबत मानसशास्त्रीय पातळीवर विश्वास पाटील यांनी केलेले भाष्य प्रभावी ठरत जाते. यांच्या कथा आणि कादंबऱ्यांमध्ये म्हणजे एकूण १७० कथा आणि जवळपास ३२ कादंबऱ्या यांत येणारा परिसर म्हणजे त्यातील अरुंद रस्ते, जंगलवाटा, अरण्य, आठवडी बाजार, गावे, वाड्या, वस्त्या यांसह गावकुसाबाहेर राहणाऱ्या समाजजीवनाचे जगणे, त्यांची शिकारीसाठी चालणारी भटकंती असे अनेक पैलू अण्णा भाऊ साठे यांच्या पंचक्रोशीत प्रत्यक्षात असणारे आहेत हे


अण्णा भाऊंच्या कार्यकर्तृत्वाच्या दशदिशा धुंडाळून,
दुर्मीळ कागदपत्रं शोधून, अण्णांचं जीवन व साहित्य
समृद्ध करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा खास शोध घेऊन;
कादबंरीकार विश्वास पाटील यांनी लिहिलेली
वाङ्मयीन चरित्रगाथा

अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान

विश्वास पाटील



आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

आपल्या लक्षात आणून देण्याचे काम विश्वास पाटील यांनी केलेले आहे. एखादा लेखक सजीव साहित्यनिर्मिती तेव्हाच करतो जेव्हा त्याच्या लिखाणात त्याच्या सभोवतालचा, आणि अनुभवाचा सजीव वापर तो करतो असे मला वाटते.

अण्णा भाऊ साठे यांच्या कथा मुन्शी प्रेमचंद यांच्या कथेप्रमाणे मानवी जीवनाचे विविध पैलू उलगडणाऱ्या आहेत तर अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या शरदचंद्र चटोपाध्याय यांच्या कादंबऱ्यांप्रमाणे मानवी जीवनातील सुखदु:खाचा अनुबंध शोधणाऱ्या आहेत, असा एकंदर विचार विश्वास पाटील यांनी अण्णा भाऊंच्या कथा आणि कादंबऱ्यांच्या अनुषंगाने केलेला दिसून येतो.

दलित आणि कष्टकऱ्यांच्या वेदनेचा उद्रेक त्यांच्या साहित्यातून झाला होता हे सांगण्यासाठी अण्णा भाऊंच्या कथा आणि कादंबऱ्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. 'महारवाडा नि मांगवाडा यात अर्ध्या फर्लांगचे अंतर होतं, आणि ते दोन्ही वाडे गाव बाहेर वाळीत पडले होते' अशा वाक्यांमधून अण्णा भाऊ साठे महार आणि मांग समाजाची परिस्थिती जास्त फरकाची नव्हती, आणि दोन्हीसुद्धा व्यवस्थेकडून शोषित होते हे सांगण्याचा प्रयत्न करतात. अशी अनेक उदाहरणे आणि दाखले लेखकाने या ग्रंथातून दिले आहेत. 'रशियाचे आमंत्रण' या प्रकरणात अण्णा भाऊ साठे यांचा रशियाचा प्रवास याबाबत विवेचन करून लेखक म्हणून अण्णा भाऊंची आंतरराष्ट्रीय ख्याती चित्रित करणारा भाग लेखकाने रेखाटला आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या लिखाणातील समृद्ध स्त्री व्यक्तिरेखा ज्या मुलीबाळींवरून लिहिल्या गेलेल्या आहेत, त्यांच्या मुळापर्यंत संशोधक म्हणून जाण्याचे काम विश्वास पाटील यांनी केलेले आहे हे आपण या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. यावरून एखादी कलाकृती जर अजरामर करायची असेल तर लेखकाने किती व्यासंगी असले पाहिजे याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे विश्वास पाटील होत.

वाघाच्या नाकाला वेसण बांधण्याची हिंमत असणारा हा महापुरुष अजून अनेक वर्षं जगू शकला असता. परंतु समाजाकडून, सत्ताधाऱ्यांकडून आणि ज्या साहित्यधर्मावर त्यांनी अवघे जीवन ओवाळून टाकले, तिथल्या सारस्वताकडून झालेल्या उपेक्षेच्या वाळवीने हा लोहपुरुष आतल्या आत पोखरत गेला आणि रानातला एखादा वृक्ष अचानक कोसळून पडावा, तशी अण्णा भाऊंना वयाच्या ४९व्या वर्षी अकालमृत्यूने मिठी मारली, हे मराठी भाषेचे आणि महाराष्ट्राचे दुर्दैव आहे; असे विश्वास पाटील यांनी कळकळून म्हटलेले दिसून येते.

अण्णा भाऊंच्या जवळपास महत्त्वाच्या साहित्यकृती, त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा, त्यांच्या कुटुंबातील त्यांचे नातलग, त्यांचे मित्र, चळवळीतील सहकारी, त्यांनी तुडवलेला भोवताल, अण्णा भाऊंच्या नजरेने व्यापलेला परिसर

आणि जैविक आणि अजैविक वातावरण या सर्वांचा आढावा विश्वास पाटील यांनी या ग्रंथामधून घेतलेला आहे यात शंका नाही. मात्र तरीही अण्णा भाऊंची वगनाट्यं आणि पोवाडे तथा लावणी यांबाबत आणखी काही संदर्भ वाचकांसमोर येणे गरजेचे होते असे मला वाटते. शृंगारिक लावणी लिहिण्याच्या काळात अण्णा भाऊंनी मुंबईची लावणी लिहावी आणि वीरप्रवृत्तीच्या लोकांचा म्हणून समजला जाणारा पोवाडा स्तलिनग्राम या शहराला संबोधून रचला जावा हे विशेष आहे. देशभक्त घोटाळे ही आजच्या काळातील पात्रं अण्णा भाऊंना साठ-सत्तर वर्षांपूर्वी गवसावीत यातून अण्णा भाऊंचा साहित्यविषयक आणि जीवनविषयक दृष्टिकोन किती लांबचा होता हे आपल्या लक्षात येते.

विश्वास पाटील यांच्या या समृद्ध संशोधनात्मक अभ्यासाला ग्रंथरूपात प्रकाशित करण्याचे काम महाराष्ट्रातील आघाडीचे असणारे 'राजहंस प्रकाशन' पुणे यांनी केले आहे. प्रीतम कुमार कसबेकर यांची रेखाचित्रे साजेशी आणि पूरक आहेत. या ग्रंथासाठी मोलाचा हातभार लावणारी छायाचित्रं शाहीर गव्हाणकर, धोंडीराम कुंभार, शहाजी थोरात यांनी उपलब्ध करून दिली आहेत ती अनमोल आहेत. अण्णा भाऊ साठे या मराठी साहित्यातील सारस्वतांकडून अडगळीत पडलेल्या सोनेरी पानाला साहित्य क्षेत्रात पुन्हा नव्याने लखलखते तेज प्राप्त करून देण्याचे काम विश्वास पाटील यांनी 'अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान' या वाङ्‌मयीन चरित्र ग्रंथातून केले आहे.

***किरण शिवहर डोंगरदिवे***
७५८८५६५५७६

अडतीस कोटी देशबांधवांची गुलामीतून मुक्तता; याच एका प्राणप्रिय ध्येयासाठी एका कडव्या, लढवय्या देशभक्ताने अर्ध्या जगात मारलेली गरुडभरारी! देशोदेशींच्या दफ्तरखान्यांत अडकून पडलेल्या दुर्मीळ दस्तऐवजांचा, नव्या संशोधित कागदपत्रांचा वेध घेऊन व त्या 'रणवाटां'वरून भ्रमण करून चितारलेली नेताजींची अपरिचित जीवनकहाणी.




महानायक

विश्वास पाटील

आवृत्ती पंचविसावी । किंमत : ₹ ६५०/- । (ट.ख. ₹ ५०)

अभिनंदन!



अरुण खोपकर लिखित
‘गुरुदत्त’ या पुस्तकाच्या
इंग्रजी अनुवादाचा
‘गूगल’तर्फे
10 Essential Books
That Teach You
More Than
Film School Could!
या यादीत समावेश...



अभिनंदन!

## पुणे मराठी ग्रंथालय, पुणे



साहित्यसम्राट
न. चिं. केळकर पुरस्कार

**गोंदणखुणा**

◆

डॉ. प्रिया निघोजकर



अभिनंदन!

## अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे



‘दयार्णव कोपर्डेकर’
राज्यस्तरीय पुरस्कार

**आबली**

◆

प्रमोद धायगुडे



# वसा अक्षर चळवळीचा

‘वाचाल तर वाचाल’ हा मंत्र समाजाला कृतीतून
दर्शविणाऱ्या समाजमाध्यमांवरील प्रेरक समूहांची माहिती

## रसिक वाचक ठाणे - वाचनप्रवासातील सुवर्णपान

शब्द हे फक्त अक्षरांचा मेळ नाहीत; ते मनाच्या कॅनव्हासवर उमटणाऱ्या रंगरेषा आहेत. विचारांची, भावनांची, अनुभवांची हळुवार भेट. गेली चार वर्षं रसिक वाचक, ठाणे या वाचनचळवळीने अशा शब्ददीपांनी मनाचे आकाश उजळवले. नुकत्याच झालेल्या शंभराव्या सत्राच्या निमित्ताने, हा प्रवास आठवणींच्या पानांवरून पुन्हा फिरून पाहावासा वाटतो.

शालेय जीवनात, सरस्वती मराठी विद्यालयातील ऑफ तास म्हणजे आमच्यासाठी अक्षरसोहळा असायचा. फास्टर फेणेच्या साहसकथा, टॉम सायर आणि हकलबरी फिनचे खट्याळ संसार, ॲलिस इन वंडरलँडची अद्‌भुत सफर, तसेच डॉ. अल्बर्ट श्वाइटझर यांची प्रेरणादायी कहाणी या साऱ्यांनी बालपण समृद्ध केले. मात्र, शिक्षण आणि नंतरच्या व्यावसायिक आयुष्याच्या धावपळीत वाचनाचा हात सुटत गेला. २०१५-१६मध्ये जाणवले माझ्या आयुष्यात वाचनाचा मोठा बॅकलॉग साचला आहे. मित्रांशी गप्पा रंगल्या आणि एक स्वप्न आकार घेऊ लागले असे व्यासपीठ हवे, जिथे आपण एकत्र बसून पुस्तकांवर चर्चा करू, त्यातील विचार वाटून घेऊ.

ते स्वप्न १ मे २०२१ रोजी आकाराला आले. सदाशिव कुलकर्णीसरांच्या आशीर्वादाने, काही सहकाऱ्यांसह रसिक वाचकचे पहिले सत्र रंगले. श्रीकांत वाळिंबे यांनी ‘गिडॉन्स स्पाइज’ - इस्त्रायलच्या मोसाद या गुप्तहेर संघटनेच्या कारवायांवरील रोमांचक पुस्तकाचे रसग्रहण केले. पुढे कोण, कोणते पुस्तक, कोणता विषय - काही ठरलेले नव्हते. पण जणू वाचनदेवतेच्या कृपेने वक्ते, विषय आणि उत्तम पुस्तके आपोआप येऊ लागली.

या मंचावर विविध विषयांच्या मोत्यांनी हार गुंफला गेला. पर्यावरणावरील निसर्गगप्पा, ज्यात हर्षद तुळपुळे यांनी २५ पर्यावरणप्रेमींशी केलेल्या मुलाखती उलगडल्या; ‘कथा जैवविविधतेची’, ‘सायलेंट स्प्रिंग’, ‘फुलपाखरू’ अशा निसर्गसंपन्न ग्रंथांचे रसग्रहण झाले. कादंबऱ्यांमध्ये कोळी बांधवांच्या जीवनाचा मागोवा घेणारी ‘गाज’, रणभूमीचा गजर असलेली ‘रारंगढांग’, तसेच पौराणिक-आध्यात्मिकतेच्या

वाटेवरची ‘ययाती’ या कादंबऱ्या रसिकांना मोहिनी घालून गेल्या. दीपक करंजीकरसरांनी त्यांच्या ‘अस्वस्थ सूत्र’, ‘घातसूत्र’, ‘विघ्नविराम’ यांसारख्या विज्ञान-तत्त्वज्ञान मिश्रित कादंबऱ्यांवर संवाद साधला.

७५व्या सत्राच्या निमित्ताने, पहिल्यांदाच प्रत्यक्ष भेटीत पुण्याचे ख्यातनाम लेखक वसंत लिमये यांनी ‘टार्गेट असद शाह’, ‘विश्वस्त’ आणि ‘लेक प्लॅसिड’वरील अनुभव वाचकांसमोर मांडले. अनुवादित व जागतिक साहित्यालाही येथे वाव मिळाला - अपर्णा गोडबोले यांचे ‘पाडस’, सिमोन द बउमार यांचं स्त्रीजीवनावरील क्रांतिकारी ‘सेकंड सेक्स’, तर रामदास खरे यांनी सादर केलेली बँकिंग विश्वावरची ‘द लास्ट बॅलन्स’.

काव्याच्या दुनियेलाही इथे स्थान मिळाले. बहिणाबाई चौधरींच्या भावस्पर्शी कविता, बा. भ. बोरकरांच्या काव्यरचना, तसेच ‘कविता वाचन एक कला’ आणि ‘छंदबद्ध कवितेची ओळख’ अशा विषयांवर चर्चा रंगल्या. विशेष उपक्रमांत ‘आषाढस्य प्रथम दिवसे’ या कालिदासाच्या नाटकाचे ऑनलाइन सादरीकरण, तसेच द. मा. मिरासदार यांच्या विनोदी कथांचं अभिवाचन प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य उमटवून गेले.

विज्ञान, इतिहास आणि आत्मचरित्रांची पाऊलवाटही गाजली. ‘जिवाणू, द मॅजिक ऑफ रियालिटी’, सावरकरांच्या तथाकथित क्षमापत्रांवरील संशोधनात्मक ग्रंथ, तसेच ‘डियर तुकोबा’सारख्या वैचारिक पुस्तकांनी वाचकांना विचारांच्या गाभाऱ्यात नेलं. आत्मचरित्रांच्या मालिकेत ‘The Winning Ways’ (हर्षा भोगले), ‘वर्दीतील माणसाच्या नोंदी’ (सदानंद दाते), ‘Finding My Core’ (विनया गोरे), ‘विशे पर्व’, आणि ‘You Must Be Joking Mr. Feynman’ या पुस्तकांनी विविध क्षेत्रांतील प्रवास समोर आणला.





एक सच्चा, सत्त्वशील सूर - भीमसेन!
भारतीय जनसंस्कृतीच्या महासागरात विरघळून गेलेला
एक सुरेल प्रवाह. त्यांची गायकी जेवढी अद्भुत,
तितकीच त्यांची जीवनकथाही अकल्पित.
त्यांच्या नाट्यपूर्ण जीवनाची, गानकर्तृत्वाची
ही चरित्रमैफील...

**भीमसेन**

वसंत पोतदार

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

१९ एप्रिल २०२५च्या शंभराव्या सत्रात, वीरमाता अनुराधा गोरे यांनी सैन्य, शौर्य, आणि पराक्रमी भारतीय स्त्रियांच्या कहाण्या 'अज्ञात शलाका' मालिकेतून उलगडल्या. उपस्थित २५०हून अधिक वाचकांना त्यांनी शहीद सैनिकांविषयी संवेदनशील प्रश्न विचारून अंतर्मुख केले. पुढील सत्रात, लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी 'वाचनकला' या विषयावर सहज, ओघवत्या भाषेत मार्गदर्शन केले.

या प्रवासामागे अनेक अदृश्य हात आहेत - वक्ते, लेखक, पुस्तकप्रेमी, परिचय व आभार सादर करणारे शुभानन आजगांवकर, श्रीकांत वाळिंबे, मनिषा चव्हाण, सुप्रिया निगुडकर, शौर्यजित कांगले; डिझाइन करणारी अमृता संभूस; डिजिटल जबाबदारी सांभाळणारे अमेय बिवलकर आणि सुयोग पाध्ये; तसेच रसिक वाचक व्हॉट्सॲप समूहातील लेखनप्रेमी. घरच्या मंडळींचा - पत्नी, मुले, वडील आणि विशेषत: आईचा - मिळालेला भक्कम पाठिंबा या चळवळीचे मूळ बळ आहे.

आज रसिक वाचक हे फक्त पुस्तक रसग्रहणाचे व्यासपीठ राहिलेले नाही; ते विचारांची देवाणघेवाण, संस्कारांची जोपासना आणि वाचनाचा परीघ वाढवणारी एक चळवळ बनले आहे. शब्दप्रेमींच्या या यात्रेत जास्तीत जास्त वाचक सामील व्हावेत, आणि वाचनाच्या ज्योतीला अखंड तेज मिळत राहावे हीच मनापासून इच्छा.


***भूषण मुळ्ये***
९८२१४६४३२१

***शब्दांकन - मनीषा चव्हाण***
८८५०८०८२५६



शास्त्रीय संगीतातही आपले वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या, संगीतक्षेत्रात लखलखती कारकीर्द साकारणाऱ्या माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त समग्र वर्मा परिवाराच्या कलाकर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या स्मृतिचित्रांचा वेधक शब्दपट -




माणिक मोती
माणिक वर्मा आणि परिवार

शोभा बोंद्रे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा




महानिर्वाण... स्थल - काल - संस्कृतिविशिष्ट संदर्भ असलेले हे नाटक. हास्याचे वेदनेत रूपांतर करणारे आणि रसरसून जगण्याचा अनुभव देणारे हे आख्यान - महानिर्वाण...

### महानिर्वाण

रेखा साने-इनामदार

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ ४२५/- । (ट.ख. ₹ ५०)

ही कथा आहे बॅरिस्टर एम. ए. जिना नावाच्या एका माणसाची! हिंदू-मुसलमानांमधील तेढ कायमची संपवण्यासाठी केलेल्या एका प्रयोगाच्या फसगतीची कथा! जन्मत:च दुभंगलेला पाकिस्तान नावाचा रक्तबंबाळ देश पदरात घेणाऱ्या एका भारतीय देशभक्ताची ही दारुण शोकांतिका...

### कायदेआझम

आनंद हर्डीकर

आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)







गांधीजी आणि विनोबा यांच्या सत्याग्रह, सर्वोदय, ग्रामदान, ग्रामस्वराज्य या विचारांतील एकत्व, विनोबांनी गांधी-विचारांची केलेली शास्त्रशुद्ध मांडणी यांचे नेटके दर्शन घडविणारा हा चरित्रग्रंथ.....

### विनोबा

भ. ग. बापट

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

*हजारो वर्षांच्या परंपरेचं पाथेय आपल्या अक्षर वाङ्मयातून पुढील पिढ्यांना देणारी, संस्कारशील असूनही आपलं स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. मायमराठीच्या समृद्ध ठेव्यातील भाषेची सौंदर्यस्थळं व सामर्थ्यस्थळं अंशरूपानं वाचकांसमोर ठेवणारं हे सदर. अखेर 'पिंडी ते ब्रह्मांडी...'*

## न पाहिलेला ताजमहाल

*'कोवळे निबंध' या प्रा. श्री. म. माटे यांच्या लेखसंग्रहातून हा निबंध घेतला आहे. ललित निबंध हा वाङ्मयप्रकार 'पर्सनल एसे' या इंग्रजीतील वाङ्मयप्रकारावरून मराठीत आला. 'गुजगोष्ट' या नावाने प्रा. ना. सी. फडके यांनी हे रोपटे प्रथम मराठी साहित्यात आणून सजवले. अनंत काणेकर, वि. स. खांडेकर, वि. पां. दांडेकर इ. लेखकांनी उत्तमोत्तम ललितनिबंध लिहून या नव्या साहित्यप्रकाराला भरघोस व रमणीय रूप प्राप्त करून दिले आहे. वाचकांशी मनमोकळे हितगुज करण्याची आवड, भोवतालच्या वस्तूंकडे व जीविताकडे बघण्याचा खेळकर प्रसन्न दृष्टिकोन आणि 'साध्या विषयांतही मोठा आशय' शोधून काढणारी तत्त्वचिंतनात्मक मनोवृत्ती यांच्या योगाने कोणताही निबंध आकर्षक होतो. प्रा. माटे यांच्या अनेक लेखांना सहजगत्या ललितनिबंधाचे स्वरूप आलेले आहे. हा लहानसा निबंधही एक नमुनेदार ललितनिबंध आहे. पाहिलेल्या गोष्टीवर कुणीही लिहू शकेल. पण न पाहिलेल्या ताजमहालावरही प्रा. माटे यांनी किती सुंदर निबंध लिहिला आहे पहा!*

मी अजून ताजमहाल पाहिलेला नाही. जगांतील बहुतेक इमारती मी न पाहिलेल्याच आहेत. इतक्या इमारती मी पाहणार तरी कसा? बांधणारे इतके निरनिराळे लोक आणि पाहायला मात्र मी एकटा, तर हें प्रमाण बसावें कसें? शेवटीं जगप्रसिद्ध इमारतींचीं जीं

चित्रे प्रसिद्ध झालेली आहेत, तीं पाहूनच मी समाधान मानतों. ताजमहाल ही इमारत त्यांपैकींच एक आहे. हिचें एक ठराविक ठश्याचें चित्र आहे. तेंच अनेक पुस्तकांतून किंवा चित्रसंग्रहांतून पाहावयास सांपडते. एका इंग्रज लेखकानें म्हटलें कीं, या इमारतीकडे पाहिलें म्हणजे एक कुलीन, सुकुमार, स्त्री सलज्ज उभी आहे असे वाटते. इतर माणसांच्या मनांत ताजमहालाच्या दर्शनाने हीच भावना उत्पन्न होते की काय हे मला माहीत नाही. ताजमहालाचीं अनेक वर्णनें मीं वाचलीं आहेत. त्यांचा परिणाम माझ्या मनावर इतका अनुकूल आणि इतका दृढ झाला आहे. की, ही इमारत प्रत्यक्ष पाहावयास जाणें मला नकोसें वाटतें, न जाणो, मनावर झालेला तो रम्य संस्कार प्रत्यक्ष दर्शनाने उडून जावयाचा! त्याचा काय नियम आहे? वाचलेलीं सर्व वर्णनें एकमेकांत मिसळतात आणि त्यांचें मोठें नाजूक, देखणें, प्रमाणबद्ध स्वप्न मनापुढें नेहमीं उभे राहतें. मी जर ताजमहाल खरोखरच पाहिला तर तें स्वप्न विरूनही जाईल. ताजमहाल तितका चांगला नसेल ही लेखकांनीं असा कांहीं संमिश्र मेळ बनविला आहे कीं, त्याचें डोळ्यापुढें उभे राहणारें चित्र प्रसिद्ध झालेल्या चित्रांपेक्षां, शतपट सुंदर आणि दिमाखदार वाटतें. असें वाटतें कीं तें जपून धरावें आणि एखाद्या वेळीं ताजमहाल प्रत्यक्ष पाहिला व तें चित्र जर भंगले तर मन:कोषांतील एक रमणीय मूर्ति मी आपण होऊन फोडून टाकली असें होईल, म्हणून तो पहावयास जाण्याच्या कल्पनेचें मला भय वाटतें.

शिवाय एकदां ताजमहाल पाहिला म्हणजे अधिक सुंदर असें कांहीं पाहावयाचें शिल्लकच राहणार नाहीं असें लोक सांगतात. ही बाब तर फारच भयंकर वाटतें. सर्व सुंदर वस्तूंचें दर्शन होऊन चुकलें. म्हणजे पुढे प्रत्येक वस्तू सामान्य आणि कुरूपही वाटू लागेल आणि जीवितांत कसलाहि राम उरणार नाहीं. त्याऐवजीं सर्वोत्तम वस्तू बघावयाची अजून राहिली आहे ही जाणीव, एक मनोज्ञ अपेक्षा, जिवंत ठेवली व कांहीं तरी साध्य अजून आहे, कोठें तरी अजून पोहोचावयाचें आहे, आजवर झालें तें कांहींच नव्हे या अपूर्णतेचें ज्ञान होत राहिलें तर पूर्णतेविषयींची आपली कल्पना अधिकच उदात्त होत राहील. म्हणून मला पुष्कळदां वाटतें कीं ताजमहाल पाहूंच नये. या माझ्या विचारांत कांहींतरी मर्म आहे हे वर्डस्वर्थ कवीची 'यारो अन्सीन्' व 'यारो सीन्' हीं दोन काव्यें वाचलीं तर पुरेपूर पटेल.

यारो नदी अत्यंत सुंदर असली पाहिजे या कल्पनेनें वर्डस्वर्थनें किती मनोरम तपशील त्या सौंदर्यात भरला होता! तो तपशील म्हणजे सौंदर्यलालसा यांचे सर्वोत्तम प्रदर्शन आहे. पण जेव्हां त्यानें यारो नदी प्रत्यक्ष पाहिली तेव्हां तो अगदीं खट्टू होऊन गेला. आपण काढलेले रमणीय चित्र पुसलें आहे, आपण घडवलेली सुस्वरूप मूर्ति भंगली आहे व भेगळलेली आहे, आपले स्वप्न वाऱ्यावर उडून गेले आहे असे त्याला वाटू लागले आणि मनानें कष्टी होऊन तो नदीच्या परिसरांतून परत आला. हाच अनुभव मलाही कदाचित येईल, या धास्तीनें ताजमहाल पाहाण्याची वासना मी दडपून टाकतों.

कांहीं सौंदर्ये अशीं असतात कीं, कसल्याही चिकित्सकाचें, वावदूकाचें, पाखंडी माणसाचें त्यानें समाधानच व्हावें. प्रत्येक सौंदर्य माणसाच्या रुचीला हमखास प्रमुदित करील असें वाटत नाहीं. त्यांत कोठें तरी एखादी तरी बोटचेपी जागा असतेच. तीच जर कां दृष्टींत भरली तर बाकीचा सौंदर्यविस्तार वाया गेला म्हणून समजावें.

मृग नक्षत्रांतील डोक्यावरची ती मेघडंबरी, या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यंत वांकलेलें तें बहुरंगी इंद्रधनुष्य, रानच्या वाऱ्यानें, वासानें आणि लांडोरीच्या आवाहनानें खुललेला व सहस्र नेत्रांनीं तिच्याकडे पाहत असलेला तो मयूर, आकाशाला भेटावयास चाललेली, उचंबळत असलेली ती गंगानदी अशांसारख्या सौंदर्याचा जो एक विशाल जामदारखाना माझ्या मनांत मी कायमचा भरून ठेवला आहे त्यांतच मी ताजमहालाची ही सांठवण केलेली आहे. वरील सौंदर्यांना कधीं भंग आहे कां? तसाच तो ताजमहालालाहि नसला पाहिजे असा माझा आग्रह आहे, हट्ट आहे. कोणी त्याविषयीं खारटतुरट बोलूं लागलें तर मी तेथून उठून जातों, कारण माझे स्वप्न मोडेल, माझी मूर्ति भंगेल, माझा देव्हारा फुटेल, माझें अमृत नासेल, मी गरीब होईन, दुनिया पोरकी होईल असा एक चमत्कारिक धाक मला वाटतो. आपल्या आईविषयीं कोणी कांहीं कुजबुजूं लागलें तर तुम्ही जसें तटकन् उठून जाल, कीं कांहीं अप्रिय कानीं पडण्यास नको आणि तें प्रेममांगल्याचें निधान भग्न व्हावयास नको, तसेंच माझें या टीकाकारांच्या सान्निध्यांत होतें. वाटल्यास हें एक वेड म्हणा, पण तें आहे खरें.

ताजमहाल कोणी बांधला, कां बांधला, त्याला खर्च किती आला, कितीजणांचा घाम गळाला, या गोष्टी मला प्रस्तुत सौंदर्यदर्शनाच्या वेळीं तरी अप्रस्तुत वाटतात. ताजमहालाचें पुढें काय होईल हें सांगवत नाहीं. पण माझ्या मनाच्या यमुनाजळांत त्याचें पडलेले प्रतिबिंब मी नेहमींच घट्ट धरून ठेवणार आहे.

*(प्रा. श्री. म. माटे लिखित 'कोवळे निबंध' लेखसंग्रहातून साभार)*

❖

भारतीय शेतकऱ्यांमध्ये जागृतीचा मंत्रजागर करणारे, बुद्धिवादी, संवेदनशील, किचकट अर्थशास्त्राच्या मुळाशी भिडणारे, आत्मशोधाचे प्रवासी आणि शेतकऱ्यांचा देव झालेले हे अफाट व्यक्तित्व जाणून घेण्यासाठी वाचायला हवे...




शरद जोशी
शोध अस्वस्थ कल्लोळाचा!

वसुंधरा काशीकर - भागवत

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

*रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री मा. नितीन गडकरी यांच्यातर्फे*
*विद्याधर अनास्कर लिखित 'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' पुस्तकासाठी शुभेच्छा*


**नितीन गडकरी**
**NITIN GADKARI**

सत्यमेव जयते
75 आज़ादी का अमृत महोत्सव

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India


Do No. 495/VIP/RT&H /2023
Date :- 12 AUG 2025

**शुभेच्छा**

'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण पुस्तक लिहून सर्वसामान्यांसाठी माहितीचे भांडार खुले केल्याबद्दल श्री. विद्याधर अनास्कर यांचे मनःपूर्वक अभिनंदन. या देशातील प्रत्येक नागरिकाचा दररोज प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे रिझर्व्ह बँकेशी संबंध येतो. पण तरीही बँकेची कार्यपद्धती, धोरणे, भूमिका, अर्थव्यवस्थेवर होणारा थेट परिणाम या गोष्टी अगदीच काही सर्वसामान्यांच्या रोजच्या चर्चेच्या नाहीत. पण, उत्सुकता तेवढी नक्कीच असते. श्री. अनास्कर यांनी या सर्व विषयांची अतिशय सूत्रबद्ध पद्धतिने उकल केली आहे. विशेष म्हणजे रिझर्व्ह बँकेचा इतिहास अधिक रंजक भाषेत सांगून त्यांनी या लिखाणाला व्यापक स्वरुप दिले आहे. एका अत्यंत जबाबदारीच्या विषयावर लिहिताना त्यांनी लिखाणात राखलेला संयम आणि त्यासाठी वापरलेली भाषाशैली, हे या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणता येईल. ब्रिटीश काळातील बँकेची कार्यपद्धती, बँकेचे नामकरण, काँग्रेसचा बहिष्कार, पहिले संचालक मंडळ ते अगदी अलीकडच्या काळापर्यंत अनेक विषयांवर त्यांनी उत्तम माहिती दिली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थायी सल्लागार समितीचे ते सलग १२ वर्षे सदस्य होते. याशिवाय सहकार क्षेत्रात कामाचा दांडगा अनुभव त्यांच्या पाठिशी आहे. त्यामुळे या विषयावर त्यांनी अधिकारवाणीने लिखाण केले आहे.

श्री. अनास्कर यांना भविष्यातील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा. परमेश्वराने त्यांना दीर्घायुरारोग्य प्रदान करावे, अशी प्रार्थना करतो.

आपला
(नितीन गडकरी)

श्री. विद्याधर अनास्कर
मो. ९८५०९७४०७५


Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: (RTH) 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F)
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in
Camp Office Nagpur : Plot No. 25, Opp. Orange City Hospital, Beside Jupiter School, Khamla Chowk, Nagpur-440015(MS)
Tel.: 0712-2239918/20/22/23/24 Email : office@nitingadkari.net

# असे जन्मले पुस्तक

## गोष्ट रिझर्व्ह बँकेची

*रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर मा. श्री. सी. डी. देशमुख यांच्या The course of my life या आत्मचरित्राची शासकीय ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या एकमेव प्रतीची झेरॉक्स प्रत मला मिळाली. तो क्षण माझ्या लिखाणाला कलाटणी देणारा व लेखमालेचा दर्जा वाढविणारा ठरला.*
*या लेखमालेचे हे पुस्तकरूप.*

‘नागरी सहकारी बँकींग क्षेत्रात काम करत असताना रिझर्व्ह बँकेच्या प्रत्येक परिपत्रकाचा मी जसा खोलवर अभ्यास करत असे तसेच त्यामागील रिझर्व्ह बँकेचा खरा आणि दर्शनी उद्देश काय असेल, याचा अंदाज बांधत मी संबंधित परिपत्रकांवर आजपर्यंत सतत भाष्य करीत आलो आहे. कोणत्याही कायद्यातील सुधारणांचा अभ्यास करीत असताना संबंधित सुधारणा विधेयकाबरोबर सरकारने दिलेले SRO म्हणजेच Statement, Reason and Object वाचल्यावर कायद्यातील सुधारणांवर भाष्य करणे सोपे जाते. माझ्या या अनुभवातून मी नागरी सहकारी बँकींग क्षेत्राच्या अडचणींवर सतत उपाय सुचविण्याचे काम करीत आलो आहे.




असेच एकदा कोरोना काळात दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनने आयोजित केलेल्या ऑनलाईन कार्यक्रमात मला केंद्रीय मंत्री आदरणीय श्री. नितीनजी गडकरी यांची मुलाखत घेण्याची संधी मिळाली. मुलाखतीत नागरी सहकारी बँकांच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेची असलेली नकारात्मक भूमिका हा विषय चर्चिला जात असताना या क्षेत्राचे नियंत्रण रिझर्व्ह बँकेऐवजी ‘नाबार्ड’कडे देणे योग्य ठरेल असे मी सुचविले.

नागरी सहकारी बँकांचे क्षेत्र रिझर्व्ह बँकेकडे देण्याऐवजी ‘नाबार्ड’कडे द्यावे या माझ्या मागणीस मा. नितीनजी गडकरी यांनीही पाठिंबा

देत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्याची सूचना केली. त्यादृष्टीने रिझर्व्ह बँकेच्या इतिहासाचा अभ्यास करीत असताना माझ्या सूचनेच्या समर्थनार्थ इतिहासातील अनेक गोष्टी माझ्या वाचनात आल्या. त्यात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे रिझर्व्ह बँकेचे तत्कालीन गव्हर्नर मा. श्री. भट्टाचार्य यांनी स्वत: सहकारी बँकांची कार्यपद्धती व्यापारी बँकांपेक्षा भिन्न असल्याने या बँकांचे नियंत्रण थेट रिझर्व्ह बँकेकडे न देता, रिझर्व्ह बँकेचाच एक स्वतंत्र विभाग असलेल्या ॲग्रीकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंटकडे देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. सहकारी बँकांमधील ठेवीदारांना विमा संरक्षण देण्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी दि. १९ नोव्हेंबर १९६३मध्ये देशातील सर्व राज्यांच्या सहकार मंत्र्यांच्या बैठकीत, केवळ काही मोजक्या रुपयांच्या ठेव संरक्षण विम्याच्या बदल्यात सहकारी बँकींग क्षेत्रावर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण घेण्यास तत्कालीन मद्रास, म्हैसूर राज्यांसह अनेक राज्यांनी विरोध दर्शविला होता. या राज्यांच्या मते रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणामुळे सहकारी बँकांची स्वायत्तता संपुष्टात येईल. तसेच भविष्यात सहकारी बँकांचे भवितव्य संपूर्णत: रिझर्व्ह बँकेच्या म्हणजेच केंद्राच्या हातात राहणार असल्याने 'सहकार' हा विषय राज्याच्या अखत्यारीतील असूनही राज्यांना या क्षेत्रासंबंधी कोणतेच अधिकार मिळणार नाहीत.

राज्यांचा हा विरोध लक्षात घेता त्या वेळी केंद्र सरकारने सहकारी बँकांच्या विकासासाठी आवश्यक तेवढेच अधिकार रिझर्व्ह बँक वापरेल असे आश्वासन उपस्थितांना दिले. त्यावेळी महाराष्ट्राचे श्री. धनंजयराव गाडगीळ, श्री. वैकुंठभाई मेहता यांनी उपस्थितांची समजूत काढत गव्हर्नर मा. श्री. भट्टाचार्य यांच्या प्रस्तावास पाठिंबा देताना गव्हर्नरांकडून घेतलेले आश्वासन खूप महत्त्वाचे होते. ते म्हणजे सहकारी बँकांचे नियंत्रण रिझर्व्ह बँकेच्या अधिकारात येणार असले तरी या बँकांची





कसे घडतात आर्थिक घोटाळे?
कसे सापडतात त्यांचे सूत्रधार? आर्थिक गुन्ह्यांचं
गुंतागुंतीचं विश्व सोप्या भाषेत उलगडून दाखवलंय,
शोधक वृत्तीच्या नि भेदक नजरेच्या
एका तरुण फोरेन्सिक ऑडिटरनं...

आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग
हर्षद ते हिंडनबर्ग

अपूर्वा प्रदीप जोशी

किंमत : ₹ ३००/- । (ट. ख. ₹ ५०)

जबाबदारी त्या वेळच्या 'ॲग्रिकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट' म्हणजे सध्याच्या 'नाबार्ड'कडेच राहील.

इतिहासातील हे टिपण, माझ्या विचारधारेशी तंतोतंत जुळत असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यामुळे याविषयी अधिक खोलात जाऊन अभ्यास करत असताना मला श्री. भुपेंद्र मित्रा यांच्या अध्यक्षतेखालील सन १९३१चा अहवाल मला वाचायला मिळाला. त्यातही रिझर्व्ह बँकेच्या सुरुवातीपासूनच कृषी पतपुरवठ्यासाठी स्वतंत्र विभागाची शिफारस होती व हा कृषी पतपुरवठा सहकारी बँकांच्या मार्फतच शक्य होईल असा स्पष्ट उल्लेख आढळला. या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँकेने सुरुवातीपासूनच कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र कृषीपतपुरवठा विभाग सुरू केल्याचे व त्यासाठी रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांची निवड केल्याचे समजले.

सहकारी बँकांसंदर्भातील इतिहासाचा अभ्यास करीत असताना मला रिझर्व्ह बँकेचा प्रथमपासूनचा इतिहास समजून घेण्याची गोडी लागली. त्यासाठी रिझर्व्ह बँकेने प्रकाशित केलेली पुस्तके, ब्रिटिश लायब्ररीमधील ग्रंथसंपदा, लोकसभेच्या ग्रंथालयातील ब्रिटीशकालीन सभांचे इतिवृत्त, आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन-१९२३मध्ये लिहिलेल्या 'रुपयाची समस्या, त्याचे मूळ व त्यावरील उपाय' (The problem of the Rupee: its origin and its Solution) या ग्रंथांची खूप मदत झाली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे न्यूयॉर्क स्थित 'JSTOR' या Digital Libraryचा मला सर्वांत जास्त उपयोग झाला. या लायब्ररीच्या माध्यमातून ब्रिटीशकालीन रिझर्व्ह बँकेचे अधिकारी व इंग्लंडचे सरकार यांच्यामधील अधिकृत पत्रव्यवहार जसा अभ्यासता आला, तसेच या अधिकाऱ्यांची खाजगी पत्रेही अभ्यासता आली. अर्थात या लायब्ररीची सदस्य वर्गणीदेखील जास्तच म्हणजे लाखात होती.

हा अभ्यास करीत असताना या विषयावर एक लेखमाला करावी असे माझ्या मनात आले. त्यादृष्टीने मी दैनिक लोकसत्ताच्या पुणे आवृत्तीचे संपादक व माझे पूर्वीपासूनचे स्नेही श्री. मुकुंद संगोराम यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनाही ही कल्पना आवडल्याने त्यांनी दै. लोकसत्ताचे मुख्य संपादक आणि 'आंतरराष्ट्रीय अर्थकारण' या विषयातील तज्ज्ञ मा. श्री. गिरीशजी कुबेर यांच्याकडे शिफारस केली. मा. श्री. गिरीशजींशी झालेल्या चर्चेत या लेखमालेचे नाव 'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' असे ठरले आणि दि. ०४ जानेवारी २०२३पासून ही लेखमाला दै. लोकसत्ताच्या सर्व आवृत्त्यांमधून प्रकाशित होण्यास सुरुवात झाली.

या लेखमालेस सुरुवातीपासूनच वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. ई-मेल्सवर कौतुकांचा पाऊस पडत असतानाच अनेक सूचना आणि अपेक्षाही येऊ लागल्या. यामुळे 'लेखक' म्हणून माझ्यावरील जबाबदारी वाढू लागली. त्यासाठी माझ्याकडून रात्रंदिवस संशोधनात्मक अभ्यास सुरू झाला. त्यामध्ये मी वर वर्णन केलेल्या संदर्भ ग्रंथांचा आणि लायब्ररीचा उपयोग तर झालाच, त्याचबरोबर भारत

सरकारच्या मुद्रण संस्थेद्वारे प्रकाशित झालेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील विधिमंडळात झालेल्या चर्चेचे सर्व खंड मला अभ्यासाला मिळाले. सन १९२७-जॉइंट कमिशनचा अहवाल, रॉयल कमिशनचा अहवाल, श्रॉफ समितीचा १९५४मधील अहवाल, भारतीय मध्यवर्ती बँकेच्या चौकशी समितीचा सन १९३१चा अहवाल इ. दस्त मला अभ्यासता आले.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर मा. श्री. सी. डी. देशमुख यांच्या The course of my life या आत्मचरित्राची शासकीय ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या एकमेव प्रतीची झेरॉक्स प्रत मला मिळाली. तो क्षण माझ्या लिखाणाला कलाटणी देणारा व लेखमालेचा दर्जा वाढविणारा ठरला. या लेखमालेचे हे पुस्तकरूप.

'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' या लेखमालेस वाचकांची प्रचंड पसंती मिळाली. मला आलेल्या एकूण मेल्सपैकी जवळ जवळ सर्वच वाचकांनी या लेखमालेचे पुस्तक व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. प्रतिक्रिया नोंदविणाऱ्या वाचकांमध्ये सर्वच क्षेत्रांतील



मंडळी जशी होती, तसेच विद्यार्थ्यांचा भरणाही अधिक होता. रिझर्व्ह बँकेच्या अनेक निवृत्त आणि सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांनी नोंदविलेल्या प्रतिक्रिया मला प्रोत्साहित करून गेल्या. मधूनच लेखमाला वाचण्यास सुरुवात केलेल्या वाचकांनी आवर्जून पूर्वीचे सर्व लेख मागून घेतले. वाचकांनी दिलेल्या प्रेरणेतूनच या लेखमालेचे पुस्तकात रूपांतर करण्याची कल्पना पुढे आली व राजहंस प्रकाशनने ती प्रत्यक्षात आणली.

***विद्याधर अनास्कर***




भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना, आजवरचा प्रवास, भूमिका आणि कार्यपद्धती, भारतासारख्या खंडप्राय विशाल देशाच्या वाटचालीत असलेला महत्त्वपूर्ण सहभाग यांचा रोचक इतिहास, तोही अत्यंत रंजक पद्धतीने...

गोष्ट रिझर्व्ह बँकेची

विद्याधर अनास्कर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## श्री. ज. जोशींची भेट

ही गोष्ट आहे अंदाजे १९८० सालामधली. कोथरूडमध्ये त्या वेळी मी धाडस करून एक छोटासा प्लॉट घेतला आणि किडूकमिडूक गोळा करून त्यावर कशाबशा दोन खोल्या उभ्या केल्या. त्या वेळी सगळीकडे ओसाडी असा प्रकार होता. 'इतक्या लांबवर कोण जाणार राहायला' असाच सगळ्यांचा विचार. आमच्या या तुरळक लोकांच्या धाडसाबद्दल अनेकांनी आमची गणना मूर्खांत केली होती. रस्ते, पाणी, वीज, वाहतुकीची साधनं - सर्वच बाबतींत नन्नाचा पाढा होता. या सर्व अडचणी सहन करून आम्ही स्वत:च्या वास्तूचा आनंद घेत होतो.

उन्हाची दुपारची वेळ. मोरे विद्यालयाच्या बसस्टॉपवर एक गृहस्थ सचिंत अवस्थेत बसले होते. हनुवटी हातावर टेकवून. मी सहज जवळ गेलो आणि भेटायला पुढे जाऊन 'आपण श्री. ज. जोशी ना?' अशी विचारणा केली.

"हो. पण तुम्ही मला कसे ओळखता?" जाड भिंगाच्या चष्म्यातून पाहत त्यांनी मला आश्चर्ययुक्त सवाल केला.

"आपलं सर्व साहित्य - कथा, ललित लेख, कादंबरी मी आवर्जून वाचतो."

"चला, बरं झालं." श्री.जं.नी सुटकेचा नि:श्वास सोडला. "मी नुकताच या माजी सैनिक वसाहतीत राहायला आलोय. पण या परिसरात माझ्या परिचयाचं कोणीच नाही हो!"

त्या दिवशी आमचा ओझरता परिचय झाला.

श्री.जं.च्या लेखनाचा मी चाहता. त्यांची 'आनंदी गोपाळ' कादंबरी मला एमएला अभ्यासक्रमात होती. त्यांचं बहुतेक सारं लेखन मी आवर्जून वाचत होतो. सहज प्रवाही कथन, कौटुंबिक प्रश्न, मिश्कील शैली, प्रश्नांवर केलेली योग्य मल्लिनाथी अशा विविध गुणांनी युक्त अशी त्यांची लेखणी. पुण्यावर प्रचंड प्रेम! 'पक्के पुणेकर' असंच त्यांचं वर्णन करावं लागेल.

हळूहळू त्यांचं माझ्या घरी येणं-जाणं वाढू लागलं. सकाळी आले की दीड-दोन तास विविध विषयांवर मनमुराद गप्पा व्हायच्या. त्यांचा व्यासंग, वाचन प्रचंड. एके दिवशी ते मला सहजपणे म्हणाले, "रानडे, तुम्ही एका डोळ्यानं आंधळे आहात?"

मी चमकून विचारलं, "म्हणजे?"

त्यावर मिश्कीलपणे हसत हसत ते म्हणाले, "अहो, तुमचं मराठी पुस्तकांचं वाचन चांगलं आहे, पण इंग्रजी वाचन शून्य! मी इंग्रजी पुस्तकं भरपूर वाचतो आणि

त्यांचे अनुवादही करतो. म्हणून तर आमच्या जयवंत दळवींनी इंग्रजी पुस्तकांची आम्हा अनेक लेखकांना भाषांतरं करण्याची संधी दिली आणि घसघशीत मानधनही दिलं. नाही तर आपले मराठी प्रकाशक! युसलेस!''

'युसलेस' हा शब्द जोशीबुवांच्या तोंडी वारंवार यायचा. एखादी गोष्ट पसंत नसली, की 'युसलेस' शब्द वापरून त्या विषयाची बोळवण ते करायचे. एकदा सहज म्हणाले, ''रानडे, तीन भेटींत समोरचा माणूस किती खोल आहे याचा मला अंदाज लागतो. मग त्याला भेटायचं की नाही, हे मी ठरवतो.'' एका प्रसंगी त्यांनी दि. बा. मोकाशी, त्यांच्या पत्नी, मी आणि माझी पत्नी सौ. संजीवनी यांना मेहूण म्हणून भोजनासाठी घरी बोलावलं होतं. त्यावरून तीन भेटींतून मी उडी मारली होती, याचा मला मनस्वी आनंद झाला.

जोशीबुवांच्या 'शब्दश्री' बंगल्यावर मी गेलो आणि बंगल्याच्या नावापुढे उभा राहून नावाकडे बघतच राहिलो. किती यथार्थ नाव! व्यंकटेश माडगूळकर यांच्या बंगल्याचं 'अक्षर' हे नाव, मुंबईच्या साहित्य सहवासातल्या इमारतींची नाव - 'ज्ञानेश्वरी', 'झपूर्झा' इत्यादी नावं मला आकर्षित करतात.

बंगल्यात गेलो की 'कमलाबाई, चहा टाका. रानडे आलेत.' हे वाक्य ठरलेलं. मग गप्पांचा ओघ सुरू. आमच्या नाटक-सिनेमा क्षेत्रातल्या लोकांविषयी त्यांना प्रचंड कुतूहल. विशेषत: त्यांच्या खाजगी आयुष्याविषयी ते मला खोदून खोदून प्रश्न विचारायचे. मी उडवाउडवीची उत्तरं द्यायचो. आपल्या ओठावरची लाळ पुसत 'युसलेस! तुम्हाला काहीच माहीत नाही.' असं म्हणायचे आणि लगेच दुसरा विषय!

श्री.ज. पुण्याच्या डिफेन्स अकाउंट्समध्ये नोकरीला होते. काही काळ हिंदी प्रदेशात त्यांची बदली झाली होती, त्यामुळे त्यांचं साहित्याचं वाचनही भरपूर होतं;




माणसासमोर उभा असलेला एक सनातन प्रश्न!
या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात मदत व्हावी,
या हेतूने अभय बंग यांनी विविध विषयांवर
लिहिलेल्या लेखांचा व दिलेल्या भाषणांचा
निवडक संग्रह.

या जीवनाचे काय करू?
...आणि निवडक

अभय बंग

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)

पण त्यांनी आपण लेखक आहोत याचा थांगपत्ता ऑफिसात लागू दिला नव्हता. संध्याकाळी नोकरीवरून घरी परतले, की सचैल अंघोळ करायचे आणि लिहायला बसायचे. त्यांची पत्नी त्यांची लेखनिक. लेखन सुरू असताना मध्येच कोणी बाहेरचे आले, तर लेखन मध्येच थांबवून त्यांच्याशी गप्पा सुरू. ते गेले, की पुन्हा शेवटच्या वाक्यापासून पुढे लेखन सुरू!

'आनंदी गोपाळ', 'रघुनाथाची बखर', अनेक कथासंग्रह, ललित लेख, वृत्तपत्रीय लेखन असं विविध प्रकारचं लेखन त्यांनी उत्तम प्रकारे केलंय. आपल्या संग्रही असलेली पुस्तकं इतरांना वाचायला द्यायला ते अत्यंत नाखूश असायचे. ''युसलेस! पुस्तक वाचायला म्हणून नेतात आणि परत आणूनच देत नाहीत.'' या नियमाला अपवाद असणारे जे कोणी भाग्यवंत आहेत, त्यांपैकी मी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. पण मला दिलेल्या पुस्तकाचं नाव ते आपल्या वहीत लिहून ठेवायचे. माझं वाचून झाल्यावर पुस्तक परत केलं, की दुसरं पुस्तक! 'लेखकाची प्रत' किंवा 'श्री. ज. जोशी' अशी त्या पुस्तकावर नोंद असायची. हळूहळू आम्हा दोन्ही परिवारांत घरोबा निर्माण झाला. मी अधूनमधून काहीबाही लिहितो याचं जोशी परिवाराला कौतुक होतं. त्यांच्या सूनबाई सौ. अश्विनी 'आनंदी गोपाळ'चा एकपात्री प्रयोग करतात, याचाही त्यांना अभिमान होता.

माझे मामा आणि मित्र श्री. भा. महाबळ हे 'किर्लोस्कर स्त्री मनोहर'च्या संपादकीय विभागात होते. माझी लिहिण्याची आवड आणि लेखकांबद्दलची ओढ लक्षात घेऊन त्यांनी 'लेखक आपल्या घरात' या सदराच्या लेखनाची जबाबदारी माझ्यावर सोपवली आणि मीही ती आनंदाने स्वीकारली. डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. आनंद यादव यांच्या मुलाखती प्रकाशित झाल्या. वाचकांचा प्रतिसाद चांगला मिळाला. माझीही उमेद


स्तानिस्लावस्की हा जगभराच्या रंगकर्मींसाठी
अत्यंत आदरणीय दिग्दर्शक. रंगमंचावरचा
सहजसुलभ वापर, प्रभावी शब्दफेक, अर्थपूर्ण विराम
यांविषयीचे त्याचे विचार आजही मौलिक समजले जातात.

रंगमंचकला



मूळ रशियन लेखक : कनस्तंतीन स्तानिस्लावस्की
इंग्रजी अनु. : डेव्हिड मॅगरशॅक
मराठी अनु. : ओंकार गोवर्धन

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

वाढली. तिसऱ्या लेखासाठी मी श्री. ज. जोशींची निवड केली. त्यांच्या सौभाग्यवती, चिरंजीव विश्वास, सूनबाई अश्विनी, मुलगी शुभदा साने (याही उत्तम लेखिका), नात प्राची यांनी घरगुती श्री.जं.चं छान वर्णन करणारे छोटे-छोटे लेख लिहिले. श्री.जं.चं बोलणं मी ध्वनिमुद्रित करीत होतो. 'लेखक श्री. ज. जोशी आपल्या घरात' हा लेख बाळसं धरीत होता.

त्याच वेळी एक शुभ घटना घडली. 'सदानंद साहित्य मंडळ' (औदुंबर, जिल्हा सांगली) यांचं श्री. ज. जोशी यांना व्याख्यानाचं आणि सत्काराचं निमंत्रण आलं. दरवर्षी जानेवारी महिन्यात संक्रांतीच्या दिवशी हा सोहळा क्षेत्र औदुंबर इथे योजला जातो. अनेक नामवंत व्याख्याते, लेखक, कवी यांचा सत्कार होतो. हा पुरस्कार मिळणं म्हणजे मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ गळ्यात पडण्याची शुभचिन्हं. श्री.ज. खुशीत होते. आमचं ध्वनिमुद्रण सुरूच होतं.

एके दिवशी सकाळी गेलो, तर श्री.ज. पलंगावर पांघरूण घेऊन बसलेले. चेहरा एकदम उतरलेला. सौभाग्यवती ताटलीत पोळी आणि कसलीशी भाजी घेऊन त्यांना ती खाण्याचा आग्रह करीत होत्या आणि श्री.ज. 'नको गं! आता वासना उडाली आहे.' असं म्हणून ताटली दूर सरकवत होते. माझ्या मनात अशुभाची पाल चुकचुकली.

दुसऱ्या दिवशी कळलं, की श्री. ज. जोशी यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलंय आणि तिसऱ्या दिवशी बातमी आली, की श्रीधर जोशी गेले. धावतपळत हॉस्पिटलमध्ये गेलो. स्ट्रेचरवर जोशीबुवा शांतपणे पडले होते.

ही दुःखद वार्ता सांगण्यासाठी शेजारीच 'रूपाली'मध्ये पु.ल. आणि सुनीताबाईंना भेटण्यासाठी गेलो.

''अरे! एकदम अचानक कसं घडलं?''

मी तरी काय सांगणार? 'कालाय तस्मै नमः' यथावकाश लेख 'मनोहर'मध्ये प्रकाशित झाला आणि माझी हे सदर पुढे चालू ठेवण्याची माझी इच्छा संपली.

अनेक दिवस श्री.जं.च्या मुलाखतीची ध्वनिमुद्रित प्रत मी माझ्या संग्रही जपून ठेवली होती. श्री.जं.चे अखेरचे विचार. मध्यंतरीच्या काळात ती कुठे गायब झाली, देव जाणे!

पण आजही त्यांचे विचार माझ्या कानांत रुंजी घालतात आणि आठवणींच्या पारिजाताचा सुगंध दरवळतो.

***श्रीराम रानडे***
९८२३१४४७०९

### पाऊस...

पाऊस सरींच्या आधी
काहूर वादळी येते
मृद्‌गंध पसरण्याआधी
मातीची लाही होते
त्या उजाड रानामधले
मन नांगरणीला येते
जड दु:खाचे पाचोळे
वळचणी लांघूनी जाते
सरलेले उरोनी पुरते
मातीच्या दानामधले
अलवार होऊनी धरणी
आभाळ पेलते आपले
गुलमोहर पायघड्यांनी
गंधाळ मोगरी द्वाही
तो वळीव घेऊन येतो
ओंजळीत सुंदर काही
तो अविरत बरसत असतो
जगण्याच्या तीरावरुनी
तो मनात तेव्हा रुजतो
सृजनाच्या थेंबांमधूनी...


***सौ. अद्वैता उमराणीकर***
९९२२०८११७३

## ‘राजहंसी’ विविधा




मला सांगा, गोव्यात काय नाही?
स्वच्छंदीपणे, अगदी मनासारखं ज्यांना गोवा
फिरायचाय, त्यांना ‘इथे आणखी केवढं
काय काय आहे’ याची झलक दाखवणारं हे पुस्तक....

### चला माझ्या गोव्याला

मिलिंद गुणाजी

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ९०/- । (ट.ख. ₹ ५०)

अरब जग म्हणजे अमाप श्रीमंती अन् उन्मादी दहशतवाद.
समज अन् गैरसमजांच्या बुरख्यात दडलेलं
हे जग आहे तरी कसं? इतिहास, राजकारण,
समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण, लोकजीवन
अशा धाग्यांचा धांडोळा घेत वाळवंटातल्या
वेगवेगळ्या पाऊलखुणांचा हा अनोखा शोध...

### धागे अरब जगाचे

विशाखा पाटील

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)






वायुसेनेत असताना पत्करलेल्या जोखमी, साहसी वृत्तीने
केलेली अचाट कामगिरी, चौकशीच्या दुष्टचक्रातून निर्धाराने
स्वतःला निष्कलंक सिद्ध केलेल्या एअर व्हाईस मार्शल
सूर्यकांत चाफेकर यांचे हे आत्मवृत्त...

### निळाईच्या छटा

सूर्यकांत चाफेकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

## अजान आणि चालिसा

*सामाजिक भान तीव्र असलेल्या कवी मुबारक शेख यांनी आपल्या व्यथांना, भावनांना, समाज जाणिवांना कवितेतून वाट मोकळी करून दिलीय. त्यांच्या 'अजान आणि चालिसा' कवितासंग्रहातून राजकारणाच्या नावाखाली नाडल्या गेलेल्या माणसांचा रोष आणि खंत संयतपणे, प्रभावीपणे प्रकट झालीय. प्रस्तुत कवितासंग्रह अनेक कळीचे प्रश्न उपस्थित करतो.*

*अन्याय, अत्याचाराच्या निर्दयी टाचेखाली*
*चिरडले गल्ली मुहल्ल्यातील उसासे*
*जातीधर्माच्या द्वेषातून पडले माणुसकीचे मुडदे*
*सामान्यांच्या दैवाचे उलटे पडते फासे.*

सामाजिक भान तीव्र असलेल्या कवी मुबारक शेख यांनी आपल्या व्यथा, भावनांना, समाज जाणिवांना कवितेतून वाट मोकळी करून दिलीय. त्यांच्या 'अजान आणि चालिसा' कवितासंग्रहातून राजकारणाच्या नावाखाली नाडल्या गेलेल्या माणसांचा रोष आणि खंत संयतपणे, प्रभावीपणे प्रकट झालीय. प्रस्तुत कवितासंग्रह अनेक कळीचे प्रश्न उपस्थित करतो. इथल्या मातीत जन्मलेल्या पिढ्यान्‌पिढ्या इथेच राहणाऱ्या, इथल्या मातीवर अविचल निष्ठा ठेवणाऱ्या देशप्रेमी भारतीय नागरिकांना सुरक्षेची हमी देण्याऐवजी, त्यांना विश्वासानं पाठबळ देण्याऐवजी त्यांना हद्दपार करण्याच्या आरोळ्या काही वाचाळ नेत्यांकडून ठोकल्या जातात. त्यामुळे अल्पसंख्याक समाज आज भयभित झाल्याचं चित्र दिसून येतंय.

सर्वसमावेशकता, सार्वमत हा संविधानाचा मूलभूत पाया आहे. परंतु हा पायाच जाणीवपूर्वक उखडून टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचं प्रकर्षानं दिसून येतं. ही राजकारणाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. इथे वर्षानुवर्षं गुण्यागोविंदानं राहणाऱ्या, गंगाजमनी संस्कृतीचं दर्शन घडविणाऱ्या समाजासमाजात भावनिक मुद्दे मांडून धार्मिक ध्रुवीकरण घडविणाऱ्या नेत्यांना 'अजान आणि चालिसा' हा विषयदेखील हिंसाचार

माजविण्यासाठी पुरेसा ठरतो. पण हा मुद्दाच लोकशाहीला गिळंकृत करणारा ठरतो, 'अजान आणि चालिसा'वरून राजकारण तापू लागतं, निवडणुकीला मुद्दा मिळतो. तोच लोकशाहीला गिळतो. दंगलीच्या अनेक कविता अंतर्मुख करणाऱ्या आहेत.

*होते देशात कुठंतरी हिंस्र हरकत*
*येते त्याला बरकत*
*उमटतात त्यांचे रक्तरंजित पडसाद*
*वाढत जातो बरबादीचा वाद*
*दोन्हीकडं लहूचा रंग लाल*
*इन्सानियतला फासला जातो हरताळ*

ही सामान्य माणसाच्या बरबादीची दास्तान कविता विषण्ण करते, लिहितं करते. केवळ संशयावरून एखाद्या निष्पापाला झुंडीनं ठेचून मारणं हे न्यायाचं कसं ठरू शकतं? अशा हिंसाचाराच्या घटना सतत घडताहेत. इथे सर्व काही 'पेड' आहे. द्वेषही 'पेड' आहे अन् दंगलही 'पेड' आहे, मृगजळाच्या वाटेवर संभ्रमाचं जाळं पसरवलं जातंय.

*अचानक दंगल उसळलेली*
*झिंदाबाद-मुर्दाबादच्या घोषणांनी*
*लोक नखशिखान्त पेटलेले*
*शिट्ट्या, लाठीमार, हवेत गोळीबार*
*तरीही पत्थरांच्या वर्षावाला 'सीमा' नसते*
*स्टेनगनच्या गोळ्यांनी*
*कित्येकांच्या बदनची चाळणी झालेली*
*मनामनाची फाळणी झालेली*




अनिष्ट प्रथा, कर्मठता, शोषण,
अज्ञान अन् दारिद्र्य यांत
पिचत असलेल्या समाजाच्या
प्रगतीसाठी उमटलेला संवेदनशील सूर.

**अजान आणि चालिसा**

मुबारक शेख

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

'जातीला जात दुश्मन' या कवितेतून कवीनं मुस्लीम समाजातील विषमतेवर, आंतर्विरोधावर जळजळीत प्रकाशझोत टाकलाय.

*कसं बसं चढू तर घेती वाढूनिया सिढ्या*
*वरपर्यंत पोचलेल्या घमेंडी अश्रफांच्या पिढ्या*

उर्दू-हिंदीमिश्रित शब्दांच्या नेमक्या योजनेन पडदानशीन जिंदगीतलं चित्र सुस्पष्ट होत जातं. मुस्लीम समाजाची मनोदशा उलगडत जाते. फिजूल परंपरेवर कवीनं केलेले वार वाचकांना अंतर्मुख होण्यास भाग पाडतात. माणसाचे दुःख, दर्द हे इथून-तिथून सारखेच जातीधर्माच्या पार असलेले. दैन्य, दारिद्र्याच्या वरवंट्याखाली भरडल्या गेलेल्या आणि बदनशिबीच्या फेऱ्यात अडकलेल्या जैतुन, चाँदनी, मुमताज, झेबुनिस्सा, मालन राबिया यांच्या अपार कष्टांचे, असह्य दुःखाचे वेगवेगळे कंगोरे मुहल्ल्या मुहल्ल्यातून उजागर होत जातात. त्या अनुभवांचे टोकदारपण कवीमनाला टोचत जाते, ते भळभळत कागदावर उतरते.

*वहिदा गाळुनी पसीना*
*बदन मोडून करित काम*
*घमेली भरून देते मिस्त्रीला*
*कसंबसं मिळविते दाम*
*डबा बाटली है क्या लोहा लोखंड*
*जिंदगीचे तुकडे खंड खंड*
*इकठ्ठा करत मोडक्या वाकड्या*
*सायकलीवरून पैडल मारत*
*अहमद दारोदार दौडत असतो अखंड*

जिवापाड राबूनही त्यांना वाजवी मोबदला मिळत नाही. मुळात कामधंद्याचा

माणसाच्या साऱ्या भावना मेंदूत उपजतात. मेंदू म्हणजे बुद्धी
आणि प्रज्ञाच नाही, तर कलाकौशल्य नि क्रीडानैपुण्यसुद्धा!
जाणिवेचा प्रकाश, नेणिवेचा अंधार या मेंदूच्या
गाभाऱ्यात एकत्र नांदतात. माणूस म्हणजे मेंदूच...
याच मेंदूचा शोध म्हणजेच माणसाचा शोध घेणारे...

**मेंदूतला माणूस**

डॉ. आनंद जोशी । सुबोध जावडेकर

आवृत्ती सातवी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)



भरवसा नसतो. मुस्लीम समाजाच्या बेरोजगारांचं अंतर्बाह्य शोषणाचं चित्रण विविध कवितांमधून येतं. एरवी कुणाच्याही लक्षात येणार नाही अशा कित्येक विषयांना कवीनं कवितांचे विषय बनवले आहे. 'अजान आणि चालिसा' हा कवितासंग्रह निराळ्या जीवनविश्वाचं दर्शन घडविणारा आहे. तो मराठी काव्य, वाङ्मयास अधिक व्यापक आणि समृद्ध करणारा आहे याची नोंद घेणं जरुरीचं आहे. चंद्रमोहन कुलकर्णी या अनुभवसंपन्न चित्रकाराचं आशयपूर्ण मुखपृष्ठ तितकंच बोलकं आहे.

***साबीर सोलापुरी***

(*सामना,* रविवार पुरवणी, ६ जुलै २०२५मधून साभार)


गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच सदर पुस्तकात गुरुदत्तच्या चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय या अंगांनी विचार केला आहे.



गुरुदत्त

तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)


## । श्रद्धांजली ।

ग्वाल्हेर घराण्याचे गायक, संगीतकार, साहित्यिक पं. श्यामराव कुलकर्णी उर्फ स्वामी धर्मव्रत यांचे ४ ऑगस्ट २०२५ रोजी दु:खद निधन झाले. राजहंस परिवाराकडून त्यांना श्रद्धांजली.

**'ग्वाल्हेर घराणं : रागविद्येची गंगोत्री'** हे त्यांचे पुस्तक राजहंस प्रकाशनाकडून जुलै २००३मध्ये प्रकाशित झाले आहे. ग्वाल्हेर घराण्याचा उगम, विकास आणि सद्य:स्थिती यांवर संगीत सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीतून प्रकाश टाकण्याचे मौलिक कार्य त्यांनी केले आहे.

# राजहंसी पार

## काय घडलं 'राजहंसी' नगरीत?

### हरवलेली ट्रॉफी आणि इतर कथा : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून शिरीष शेवाळकर, श्रीराम रानडे, नीला प्रभावळकर, दिलीप प्रभावळकर, दिलीप माजगावकर आणि डॉ. सदानंद बोरसे

रंगभूमी, चित्रपटसृष्टी, साहित्य आदी क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा अमीट ठसा उमटविणारे प्रख्यात अभिनेते व प्रतिभावान साहित्यिक दिलीप प्रभावळकर यांच्या 'हरवलेली ट्रॉफी आणि इतर कथा' या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन त्यांच्याच जन्मदिनी ४ ऑगस्ट २०२५ रोजी अनौपचारिकरीत्या करण्यात आले.

खास 'दिगमा' शैलीत दिलीप प्रभावळकर यांच्या घरी वाढदिवशी अनपेक्षित भेट देऊन या पुस्तक प्रकाशनाचा सुखद अनुभव सर्वांनीच घेतला. राजहंस प्रकाशनाचे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर, मुख्य संपादक डॉ. सदानंद बोरसे, निर्मितिप्रमुख शिरीष शेवाळकर, ज्येष्ठ रंगकर्मी श्रीराम रानडे, नीला प्रभावळकर आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

❖

# मी... अल्लादियाखां : प्रकाशन सोहळा




डावीकडून अश्विनी भिडे देशपांडे, उल्हास कशाळकर, मुकुंद संगोराम,
डॉ. सदानंद बोरसे आणि ज्ञानेश चिरमुले

जयपूर-अत्रौली ख्यालगायन परंपरेचे उद्गाते, गायनाचे गौरीशंकर उस्ताद अल्लादियाखांसाहेब यांचे ललित चरित्र 'मी... अल्लादियाखां' या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. हल्लीच नूतनीकरण होऊन दिमाखात उभ्या राहिलेल्या रवींद्र नाट्य मंदिरात उस्ताद अल्लादियाखां साहेबांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी हा देखणा सोहळा उत्साहात संपन्न झाला. जयपूर-अत्रौली घराण्याच्या आजच्या आघाडीच्या गायिका डॉ. अश्विनी भिडे देशपांडे यांनी हे पुस्तक लिहिले आहे. मुखपृष्ठ रचना श्री. मयूर कुलकर्णी यांची आहे. पुस्तकाचे रेखीव मुखपृष्ठ आणि त्यातील साधेपणा श्री. ज्ञानेश चिरमुले यांनी त्यांच्या रेखाचित्राच्या (पेन्सिल स्केचच्या) माध्यमातून रेखाटला आहे.

पुस्तकाच्या उद्घाटन सोहळ्याला लोकसत्ताचे माजी संपादक मुकुंद संगोराम, राजहंस प्रकाशनाचे संपादक डॉ. सदानंद बोरसे आणि ग्वाल्हेर घराण्याचे सुप्रसिद्ध गायक पं. उल्हास कशाळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणास्तव विदुषी श्रुति सडोलीकर काटकर हजर राहू शकल्या नाहीत; परंतु त्यांनी पत्राद्वारे त्यांचा संदेश कळवला.

कार्यक्रमाची सुरुवात अश्विनीताईंच्या दर्जेदार अभिवाचनाने झाली. त्यानंतर ताईंनी मान्यवरांचे यथोचित स्वागत करून आपले मनोगत व्यक्त केले. ''कलाकाराचं कौशल्य तो किती आणि काय गातो यापेक्षा तो काय गाणं टाळतो यावर असतं. कौशल्याच्या

प्रदर्शनापेक्षा सादरीकरणाचा हेतू, त्याचं मर्म महत्त्वाचं असतं. टाळ्या मिळाल्या म्हणजे गाणं चांगलं झालं असं नसतं, हा धडा आमचे गुरू आम्हाला देत असत.' असं म्हणत अश्विनीताईंनी गुरुशिष्य परंपरेचे महत्त्व थोडक्यात प्रतिपादित केले.

मुकुंद संगोराम त्यांच्या भाषणात म्हणाले की, 'एखाद्या व्यक्तीचे चरित्र लिहिणे ही एक गोष्ट झाली; पण एखाद्या कलाकाराची आत्मनिवेदनपर चरित्रात्मक कादंबरी लिहिणे आणि तेही एका कलाकाराने लिहिणे हा एक नवीन घाट आहे.'

एक व्यक्ती आपल्या आयुष्यात इतक्या उच्च दर्जाच्या अनेक गोष्टी कशा काय करू शकते, याचे आश्चर्य नोंदवत डॉ. सदानंद बोरसे म्हणाले, ''अश्विनीताईंनी निश्चितच आपले संगीत, साहित्य, नाट्यमय अभिवाचन, समर्थ गुरू असे अनेक 'क्लोन्स' तयार केले असणार ज्यामुळे त्या इतक्या सहजतेने त्यांची प्रत्येक भूमिका यशस्वीपणे निभावतात.

पं. उल्हास कशाळकरांनी अश्विनीताईंना असे अनेक उपक्रम पुढेही राबवण्यासाठी मनापासून आशीर्वाद दिले. अश्विनीताईंचे पती राजेंद्र देशपांडे यांच्या आभारप्रदर्शनाने 'मी... अल्लादियाखां' या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा दिमाखात पार पडला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'वारसा जयपूर-अत्रौलीचा' या नावाने अश्विनीताई व त्यांच्या शिष्यवर्गाने मिळून खांसाहेबांना सांगीतिक आदरांजली वाहिली व एक प्रकारे गुरुशिष्य परंपरेच्या गौरवशाली वारशाचे यथार्थ दर्शन घडवले. या कार्यक्रमाला तबल्यावर श्री. यती भागवत आणि संवादिनीवर श्री. सिद्धेश बिचोलकर यांची उत्तम साथ लाभली.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला संगीत व कला क्षेत्रातील अनेक मान्यवरांची वर्णी लागली. त्यांपैकी काही वानगीदाखल नावे म्हणजे, उस्ताद तौफ़ीक़ कुरेशी, गितीका वर्दे कुरेशी, विदुषी अर्चना कान्हेरे, उपशास्त्रीय संगीतातील जेष्ठ गायिका श्रीमती शुभा जोशी, सौ. उषा टिकेकर, पॉप्युलर प्रकाशनचे ९० वर्षीय संस्थापक श्री. रामदास भटकळ, स्वराधीश डॉ. भरत बलवल्ली, सुमीत राघवन, चिन्मयी सुमीत, पं. रघुनंदन पणशीकर, वि नंदिनी बेडेकर, पं संजीव चिमलगी.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनीताईंची कन्या निरंजनी देशपांडे हिने तिच्या ओघवत्या शैलीत केले.

❖

# श्री. ग. माजगावकर पुरस्कार प्रदान सोहळा



डावीकडून डॉ. सदानंद बोरसे, अरुणा ढेरे, दिलीप माजगावकर आणि दिलीप कुलकर्णी

राजहंस प्रकाशन आणि डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृति-संशोधन केंद्र यांच्या सहयोगाने 'माणूस'कार श्री. ग. माजगावकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा श्री. ग. माजगावकर पुरस्कार पर्यावरण अभ्यासक व निसर्गस्नेही, लेखक दिलीप कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. राजहंसचे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर तसेच डॉ. रा. चिं. ढेरे प्रतिष्ठानच्या अरुणा ढेरे, वर्षा गजेंद्रगडकर या सर्वांच्या हस्ते एका अनौपचारिक सोहळ्यात पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास राजहंसचे मुख्य संपादक डॉ. सदानंद बोरसे, रेखा माजगावकर, निर्मितिप्रमुख शिरीष शेवाळकर, डॉ. पौर्णिमा कुलकर्णी व त्यांचे कुटुंबीय, डॉ. श्रीराम गीत, विनया खडपेकर, आनंद हर्डीकर, डॉ. सुलभा बोरसे, प्रशांत दीक्षित, आरती घारे, निरंजन आगाशे, डॉ. प्रिया निघोजकर, माधव गोखले, श्री. व सौ. रानडे आदी उपस्थित होते.

पुरस्कारार्थी दिलीप कुलकर्णी यांनी उपस्थितांशी मनमोकळा संवाद साधला व विचारलेल्या प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. माजगावकर सरांनी 'श्रीगमां'च्या काही आठवणींना उजाळा दिला. एक हृद्य अनौपचारिक सोहळा राजहंस परिवाराने अनुभवला.

❖

## वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा,*
*तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू.*
*प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

### ‘मनू’चे अरण्य

नुकतंच आपण लिहिलेलं ‘ ‘मनू’चे अरण्य’ निवांत वाचून पूर्ण केलं. ॲमेझ्ञान नदी व जंगलांविषयी थोडंफार वाचन व यूट्यूब व्हिडीओ पाहिले आहेत. पण आपलं हे पुस्तक सर्वंकष वाटलं ते ओघवत्या व सालंकृत भाषेनं, सविस्तर पण चटकदार माहितीनं आणि अप्रतिम फोटोमुळे...

कोणत्याही प्रवासवर्णनाचा हे पुस्तक मापदंड ठरावं इतकं ज्ञानवर्धक. कोणीतरी आपलं बोट धरून अप्रत्यक्षपणे का होईना पण त्या परिसराची भ्रमंती करून आणतंय हीच सततची भावना...

असा ठेवा आम्हा निसर्गप्रेमी भटक्यांसाठी दिल्याबद्दल कृतज्ञता.

***अमर करंदीकर***, पुणे

‘मनू’. पेरू देशाच्या दक्षिणेला उगम पावणाऱ्या
अन् महाकाय ॲमेझॉनला मिळणारी एक नदी.
हजारो प्रजातींच्या विविधरंगी जीवसृष्टीला अंतरंगात
सामावून घेणाऱ्या या सदाहरित घनदाट जंगलात
एका झपाटलेल्या निसर्गप्रेमीने केलेल्या
मनसोक्त भटकंतीतून नजरेपुढे साकार झालेले

‘मनू’चे अरण्य

डॉ. संदीप श्रोत्री




आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा




गडचिरोलीसारख्या आदिवासी भागात स्वयंप्रेरणेने राहून आरोग्य सेवा देणारे डॉक्टर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक अभय बंग यांचा हृदयरोगाचा प्रत्यक्षानुभव, त्यासंबंधीचं सकारात्मक चिंतन... त्यांचा हा अचंबित करणारा प्रवास वाचायलाच हवा...

### माझा साक्षात्कारी हृदयरोग

डॉ. अभय बंग

आवृत्ती पंचविसावी । किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)

माणसाच्या मनात दडलेली क्रौर्यभावना जनसंहाराला कारणीभूत ठरते का? जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या कारणाने भडकणाऱ्या या भयंकर वणव्याचा अभ्यासपूर्ण वेध.....

### जनसंहार

अच्युत ओक

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)






ही कहाणी केवळ आकाशात भरारी घेणारा वैमानिक कायमसाठी चाकाच्या खुर्चीत जखडबंद होतो त्याची नाही, तर पुनश्च 'राखेतून उगवतीकडे' निग्रहाने झेपावतो, त्याची आहे.

### राखेतून उगवतीकडे

विंग कमांडर अशोक लिमये

अनुवाद : सोनाली नवांगुळ

किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

# ज्ञात अज्ञात अहिल्याबाई होळकर

अहिल्याबाईंविषयी चरित्रात्मक स्वरूपात वाचलेले माझे हे पहिलेच पुस्तक. खडपेकर मॅडम आणि राजहंस प्रकाशन यांचे मला खूप कौतुक वाटले. प्रकाशकांनी नेटकी बांधणी, उत्तम मुद्रण करून पुस्तक आम्हा वाचकांकडे सुपूर्द केल्याबद्दल त्यांचे आभार.

विनयाताईंनी ज्या अहिल्याबाई आमच्या डोळ्यांसमोर उभ्या केल्या, त्या वास्तव आहेत. मोठेपणाचा, दिखाऊपणाचा भपका त्यात कोठेही नाही. अत्यंत करारी, विनम्र, सत्त्वशील, तडफदार आणि कर्तृत्ववान अहिल्याबाई अनेक प्रसंगांतून उलगडत गेल्या. जीवनातील क्षणाक्षणांत राजकारण विविध अर्थांनी असते. सजग व सावध भूमिकेत आपले निर्णय कसे अमलात आणावेत हे शिकता आलं. इतक्या मोठ्या होळकरशाहीच्या प्रमुखपदी वावरताना त्यांच्या मागे होते ते त्यांचे सत्त्व, त्यांची भक्ती आणि त्यांचं संचित! मल्हाररावांच्या मागेही त्यांनी आपल्या घराण्याची पत सांभाळली, वाढवत नेली.

आपल्या नजरेसमोर विनयाताईंनी हा सारा जीवनपट अतिशय अभ्यासपूर्ण, नीटनेटका आणि त्रयस्थ भूमिकेतून मांडला. केवळ आपली मतं वाचकांवर इतिहासाच्या दाखल्यांनी न थोपवता वाचकांना विचार करायला आणि डोळे उघडून सावध जगायला या पुस्तकरूपाने प्रवृत्त केले असे मला वाटते.

लेखिका आणि प्रकाशक यांच्या पुढील वाटचालीसाठी अगणित शुभेच्छा!

***प्रीतम ओगले***, दाभोली, सिंधुदुर्ग


महाराष्ट्राच्या कोपऱ्यातल्या खेड्यातली मुलगी
इंदूरच्या सुभेदार होळकरांची सून झाली. अठराव्या
शतकातल्या मराठा साम्राज्याचा आधारस्तंभ ठरली.
ती सत्ताधारी होती, पण ती सिंहासनावर नव्हती.
ती राजकारणी होती, पण ती सत्तेच्या
चढाओढीत नव्हती. तिचे चरित्र...

ज्ञात-अज्ञात **अहिल्याबाई होळकर**

विनया खडपेकर



आवृत्ती आठवी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

## गोंदणखुणा

'गोंदणखुणा' पुस्तक म्हणजे सुंदर, हळवी, संवेदनक्षम अक्षरचित्रेच...

पुस्तक वाचल्यावर हे शब्द आपसूकच मनात येतात. या ललित लेखसंग्रहाचे हेमकिरण पत्की यांचे मनोगत वाचनीय, मनोज्ञ आहे. पुस्तकातील रेखाचित्रे आशय अंतरंगात उतरवायला मदत करतात. पुस्तकात किती लेख आहेत हे मी सांगणार नाही. कारण एखादे सुंदर फुलांचे झाड असेल, तर आपण 'किती सुंदर फुले लागली आहेत!' असे म्हणतो. ती आपण मोजत नाही. त्याप्रमाणे हे नितांतसुंदर लेखांचे पुस्तक आहे.

'मोल चार आण्याचे...' या संग्रहातील पहिल्याच लेखात लेखिका आपले मन जिंकते. साधी, सरळ, प्रवाही, मनाला भिडणारी अशी भाषाशैली आहे. हा लेख इंग्रजी माध्यमाच्या मराठी विषयाच्या आठवीच्या पाठ्यपुस्तकात आता समाविष्ट झाला आहे ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. आपण सहजच एकएक लेख वाचत जातो. एकएक पान उलटत जातो. पुस्तक कधी संपते हे लक्षातही येत नाही. जेव्हा वाचून पूर्ण होते. तेव्हा अत्यंत आनंद, समाधान यांनी आपले चित्त ओतप्रोत भरून जाते. हा एक विलक्षण अनुभव आहे. रसिक वाचकांनी तो घ्यायलाच हवा.

अभिराम भडकमकर एकदा एका भाषणात म्हणाले होते की, भाषा आणि साहित्य म्हणजे काय? तर भाषा म्हणजे एकमेकांशी संवादाचे माध्यम. साहित्य म्हणजे काय याचे त्यांनी एक उदाहरण दिले होते. ते असे - 'एक माणूस मासे पकडायला जात असतो. दुसरा माणूस त्याला विचारतो 'घावला का मासा?' तो उत्तर देतो, 'नाय बा. एक बी मासा घावला नाय. जणू नदीला एकादस होती.' हे उदाहरण अभिराम




निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील
अतर्क्य भावनाट्य किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं
स्वत:ला नि:संदर्भ होऊन करून केलेलं आत्मचिंतन.
एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या सखीला
कधी मनोगत तर कधी हृद्‌गत सांगावं,
तसा आशय सांगणारा लेखसंग्रह...

**गोंदणखुणा**

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

भडकमकर यांनी व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील सांगितलेले आहे. पण या प्रकारची भाषा या पुस्तकातही पानोपानी आहे. काही ठिकाणी आपण विचारात पडतो. पुस्तकातील 'सागरगोटे' हा लेख आपल्याला बालपणात घेऊन जातो. 'भावसखी बाभूळ' या लेखात झाडाला सखी म्हणून त्याचे भावविश्व छानच चितारले आहे. बाभळीचे अक्षरचित्र पाहून आपण सुखावून जातो. 'गुंजभर सोनं' कशाला म्हणतात.. ते 'गुंजभर आठवण' या लेखात छान सांगितले आहे. 'दीपमाळ' या लेखात कोणत्या प्रश्नांची माळ लेखिकेला अस्वस्थ करते, ते जरूर वाचावे.

*'प्रेमपूर्ण मधुं बाल्य आहा ते'* या लेखमालेमध्ये निसर्गाचे आणि माणसाचे सनातन तरीही अद्वैत असणारे सुंदर नाते चितारले आहे. सगळे लेख वाचताना मनात एक सुंदर चित्र तयार होते. विनोबा भावे म्हणत, 'अर्थ पुस्तकात राहत नाही; अर्थ सृष्टीत राहतो.' पुस्तकातील या सगळ्या लेखनाचा अर्थ आपल्यालाही सृष्टीत शोधावा लागेल.

'सुगरण' या लेखात विंदा करंदीकर यांच्या 'झपताल' या कवितेचा उल्लेख येतो. या कवितेत सुगरणीचे केलेले वर्णन अगदी यथार्थ आहे.

अनेक काव्यमय संदर्भ, थोर विचारवंतांचे विचार पुस्तकात आहेत. त्यासोबतच लेखिकेचे तत्त्वचिंतन लालित्याच्या अंगाने बहरले आहे. आपण अनेक वेळा माचणूरला जातो; पण तिथली शांतता, सौंदर्य लेखिकेला भुरळ पाडते. त्या शांततेकडे, सौंदर्याकडे आपले फार कमी लक्ष जाते. 'इथे शांतताच निवाऱ्याला आलीय' या लेखात माचणूरविषयी, त्या परिसराविषयी सुंदर लिहिले आहे.

विद्या बेलसरे, डॉ. सु रा. चुनेकर हे लेखिकेचे शिक्षक आपल्याला लेखांमधून भेटत राहतात व आपल्याही भाव विश्वाचा भाग होतात. निसर्गावर प्रेम करणाऱ्या माणसांनी, माणसांवर प्रेम करणाऱ्या माणसांनी जरूर वाचावे, असे हे सुंदर पुस्तक आहे.

***श्रीधर मधुकर खेडगीकर***, सोलापूर

**मुखपृष्ठावरील पुस्तकाविषयी**

- आरोग्य-स्वराज्य किंमत : ₹ ४३०/-
  डॉ. अभय बंग

कधी न गळणारा

## 'राजहंसी' मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**'राजहंस ॲप'**

Download on the App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Get it on Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com I Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्य अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

# इंद्रधनुषी साहित्य योजना

## सप्टेंबर २०२५ महिन्यातील सप्ततारांकित लेखकांची साहित्यसंपदा

**वीणा गवाणकर**



। किमयागार कार्व्हर । सर्पतज्ज्ञ : डॉ. रेमंड । रॉबी डिसिल्वा ।
। लीझ माइट्नर । डॉ. खानखोजे । अवघा देहचि वृक्ष जाहला... ।
। डॉ. आयडा स्कडर । डॉ. सालिम अली । एक होता कार्व्हर ।

**विनया खडपेकर**



। ज्ञात-अज्ञात : अहिल्याबाई ।
। स्त्रीस्वातंत्र्यवादिनी । निवडक शकुंतला परांजपे ।
। एक होती बाय । विवाह नाकारताना ।

**मंगला आठलेकर**




। पुन्हा एकदा 'स्त्री -पुरुष' तुलना । महापुरुषांच्या नजरेतून ।
। गार्गी अजून जिवंत आहे । महर्षी ते गौरी । जयवंत दळवींविषयी ।
। हे दु:ख कुण्या जन्माचे । जगायचीही सक्ती आहे... । बुद्ध हसतो आहे ।

**सोनाली कुलकर्णी**



। सो... कुल... ।
। सो कुल.. टेक २ ।

**विशाखा पाटील**



। जॉर्ज ऑर्वेल । सावध ऐका... ।
। धागे अरब जगाचे । कल्चर शॉक - आखाती देश ।

**मेघना पेठे**



। नातिचरामि ।
। आंधळ्याच्या गायी ।

**माधुरी शानभाग**




जीवनात आनंद फुलवा! । लेटर्स टु अ यंग सायंटिस्ट
फ्रेग्रन्स ऑफ दि अर्थ । अग्निपंख । चंद्रशेखर । ब्रेनवेव्हज

Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 10th of every month and posted on 12th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post

## इंद्रधनुषी साहित्य योजनेची खास वैशिष्ट्ये

- ऑगस्ट २०२५ - डिसेंबर २०२५ या ५ महिन्यांत दरमहा ७ वेगवेगळ्या लेखकांचे साहित्य **२५% सवलतीत.**
- इतर सर्व 'राजहंसी' लेखकांचे साहित्य **१५% सवलतीत.**
- ही योजना राजहंसच्या सर्व शाखा, वेबसाइट, ॲप आणि निवडक पुस्तकविक्रेत्यांकडे उपलब्ध.
- राजहंस वेबसाइटवरून खरेदी करणाऱ्या ग्राहकांना पुस्तके भारतात कुठेही राजहंस प्रकाशनाच्या खर्चाने रजिस्टर पोस्टाने पाठवली जातील.

अधिक माहितीसाठी

स्कॅन करा

८३७८८३६८३६

राजहंस वेबसाइटला भेट द्या
www.rajhansprakashan.com

किमान रु. २०००/-च्या खरेदीवर कविवर्य **मंगेश पाडगावकरांच्या 'कथारूप महाभारत'** या द्विखंडात्मक ग्रंथाची एक प्रत **'राजहंस'तर्फे सप्रेम भेट.**
(या भेटीचा लाभ घेण्यासाठी खरेदीच्या पावतीचे छायाचित्र व्हॉट्सॲपद्वारा **८३७८८३६८३६** या मोबाईल क्रमांकावर पाठवावे.)

प्रेषक : राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे